
बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | गुरूवार,दि.२९ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२८३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# युद्धाला थांबविण्यासाठी पाककडून दोनदा कॉल!

देशात वाढला होता प्रचंड तणाव | शस्त्रसंधीबद्दल नवीन माहिती समोर | ऑपरेशन सिंदूरमध्ये १६० जणांचा मृत्यू

## मृतांचा आकडाही आला समोर

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उडवले. ६ आणि ७ मे रोजीच्या रात्री केलेल्या या लष्करी कारवाईनंतर पुढे लष्करी संघर्ष वाढला. दोन-तीन दिवस दोन्ही देशात तणाव प्रचंड वाढला होता. पण, नंतर अचानक शस्त्रसंधी झाली. या शस्त्रसंधीबद्दल नवीन माहिती समोर आली आहे.

सूत्रांच्या हवाल्याने याबद्दलचे वृत्त दिले आहे. सूत्रांनी सांगितले की, भारताने दहशतवादी अड्ड्यांवर हल्ले केल्यानंतर पाकिस्तानकडून एकदा नव्हे तर दोन वेळा कॉल करण्यात आला होता. याच चर्चेत दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करण्यास सहमती दिली. ही शस्त्रसंधी तणाव कमी करण्यासाठी करण्यात आली. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर ७ मे रोजी सायंकाळीच पाकिस्तानकडून भारताला दोन वेळा कॉल करण्यात आला. हा कॉल शस्त्रसंधी करण्यासंदर्भात होता. पाकिस्तानी लष्कराचे डीजीएमओ यांच्याकडून औपचारिकपणे भारताशी संपर्क करण्यात आला होता. त्यानंतर १० मे रोजी दुपारी ३.३५ वाजता भारत आणि पाकिस्तान यांच्यातील डीजीएमओ यांच्यात चर्चा झाली होती.

**ऑपरेशन सिंदूरमध्ये १६० जणांचा मृत्यू**

भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये अनेक दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. याचा आकडा आता समोर आला असून, १६० जणांचा मृत्यू झाला आहे. बहावलपूर येथील हल्ल्यात २० पेक्षा जास्त मारले गेले. हा जैश ए मोहम्मदचा अड्डा होता. त्याचबरोबर भारत आणि पाकिस्तान यांच्यात जो लष्करी संघर्ष झाला. त्यात पाकिस्तानच्या ४० सैनिकांचा मृत्यू झाला. पण, पाकिस्तानने ११ जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे.

# झाडाला बांधून तरुणांना मारहाण!

## खळबळ: केज तालुक्यातील घटना,एकाचा मृत्यू, दुसरा गंभीर !

पुण्यभूमी प्रतिनिधी



तालुक्यातील भाटुंबा येथील दगडू उर्फ आण्णा ज्ञानेश्वर धपाटे वय २७ वर्षे हा आपल्या मित्रासह दुचाकी वरून जात आसताना त्याची दुचाकी त्याचा मित्र आसलेल्या सावळेश्वर (पैठण ) येथील वैभव मस्के याने मामाच्या शेतात घ्यायला लावली. व या ठिकाणी मामाच्या शेताच्या बांधावरील एका झाडाला बांधून त्याला सात जणांनी लाकडी काठीने व चमड्याच्या बेल्टने मारहाण करुन औरंगपूर शिवारातील पवनधाम मंदिराच्या परिसरातील एका रस्त्याच्या कडेला टाकून देण्यात आले. उपचारासाठी त्याला अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात दाखल केले आसता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला मयत घोषित केले. या घटनेने केज तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

केज तालुक्यातील भाटुंबा येथील दगडू उर्फ आण्णा उर्फ ज्ञानेश्वर दत्तात्रय धपाटे वय २७ वर्षे हा सोमवारी (दि. २६ ) सायंकाळी साडेचार वाजता त्याचा मित्र सचिन करपे सह दुचाकीवरून जात आसताना, सावळेश्वर (पैठण) येथील रोहन उर्फ रोहित मस्के , वैभव उर्फ सोन्या मस्के व लाडेगाव येथील सुहास पाटोळे, राजेश जंगले, अन्वर पठाण, आशिष अंबाड यांनी त्यांची दुचाकी अडवून त्या दोघांनाही रोहन मस्के यांच्या मामाच्या शेतात घेऊन गेले. तेथे त्याला शेताच्या बांधवरील एका झाडाला बांधून या सात ते आठ जणांनी लाकडी काठी आणि चमड्याच्या बेल्टने अमानुष मारहाण केली. त्यानंतर अविवाहित आसलेल्या दगडू धपाटे याला जखमी व बेशुद्द्धावस्थेत औरंगपूर शिवारातील पावनधाम मंदिर परिसरातील रस्त्याच्या कडेला टाकून दिले व सर्व जण पळून गेले. प्रकरणी मयताचा भाऊ सिद्धेश्वर धपाटे रा भाटुंबा याच्या फिर्यादी वरून युसुफवडगाव पोलिस ठाण्यात मंगळवारी दुपारी सात अरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आसून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे हे करीत आहेत.

### ६ अरोपी जेरबंद

या प्रकरणातील अरोपी पैकी रोहन उर्फ रोहित मस्के, वैभव उर्फ सोन्या मस्के रा सावळेश्वर (पैठण), सुहास पाटोळे, राजेश जंगले, अन्वर पठाण, रोहित धीरे, तिघेही रा लाडेगाव या सहा आरोपीना त्यांच्या घरातून व शेतातून जेरबंद केल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांनी दिली. दरम्यान या प्रकरणातील आशिष अंबाड रा लाडेगाव हा अद्याप फरार आहे.

# आर.टी.जिजांना अखेरचा निरोप

## आदरांजली:शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, भाजपचे माजी बीड जिल्हाध्यक्ष आर. टी. देशमुख यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी परळी येथील त्यांच्या निवासस्थानाच्या बाजूला अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, खा. बजरंग सोनवणे, खा. ओम राजेनिंबाळकर, आ. राजेश विटेकर, आ. रत्नाकर गुट्टे, अक्षय मुंदडा, माजी आ.उषाताई दराडे, पोलीस महासंचालक शहाजी उमाप, मराठा सेवा संघाचे प्रा एम.एल. देशमुख,अजय बुरांडे, आनंद इंगळे आदींसह प्रशासनातील अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली वाहिली. भाजपसह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.२६ मे रोजी सायंकाळी आर. टी. देशमुख यांचे औसा तालुक्यातील बेलकुंड-उजनी परिसरात मोटार उलटून झालेल्या अपघातात निधन झाले होते. मंगळवारी देशमुख यांच्या मृतदेहाची लातूर येथे उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यांचा एक मुलगा रोहित हे जपानला असल्याने ते आल्यानंतर अंत्यविधी बुधवारी करण्यात आले.



# बीडमध्ये भारत जिंदाबाद रॅली

## महेश आठवले:सहभागी होण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे » पान २ वर

# जाहिर नाम्याची होळी; महायुती सरकारचा धिक्कार!

## तांदळा उपोषणाचा चौथा दिवस: शासन प्रशासनाच्या नावाने बोंबाबोंब



पुण्यभूमी प्रतिनिधी

कोळगाव: बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभारले असून मौजे तांदळा येथे जायकवाडीच्या पाण्यासाठी आमरण उपोषण सुरु आहे, उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली असून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासन प्रशासनाच्या नावाने शेतकऱ्यांनी बोंबाबोंब केली आहे,१४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत महायुती सरकारचा जाहिर नाम्याची होळी करत सरकारचा धिक्कार केला आहे.उपोषणकर्त्ये अजय पाटील यांनी पुन्हा एकदा उपचार नाकारले असल्याने परिस्थिती गंभीर बनत चालली आहे.

जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील शेतीला » पान २ वर

### मी शेतकऱ्यांसोबत- खा. सोनवणे

तांदळा येथील उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांच्याशी बुधवारी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. शेतकर्यांचे पाण्याविना हाल होत आहेत, या भागातील शेतीला धरणाचे पाणी गरजेचे आहे, यासाठी शेतकर्यांनी जे लोकलढा आंदोलन सुरू केले आहे, त्यास आपला पाठिंबा असल्याचेही ते म्हणाले.

### गेंड्याच्या कातडीचे सरकार- नांदगावकर

मनसे नेते तथा माजी आमदार बाळा नांदगावकर यांनी बुधवारी आंदोलकांशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. नांदगावकर म्हणाले, की हे गेंड्याच्या कातडीचे सरकार आहे, हे सरकार शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही, मनसे शेतकऱ्यांसोबत असून शेतकर्यांसाठी आंदोलनात उतरू असेल नांदगावकर म्हणाले.

**अमितेश कुमार** | **अमनोरा सिटी कॉर्पोरेशनतर्फे वाहने सुपूर्द**

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस कटीबद्ध

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:अमनोरा सिटी कॉर्पोरेशनने पोलीस दलाला दिलेल्या नऊ वाहनांमुळे पोलिसांची कार्यक्षमता वाढीस लागण्यास उपयोग होणार आहे. पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटीबद्ध आहे. पुण्यातील वाहतूक प्रश्नासह महिला सुरक्षा, रस्त्यांवरील गैरप्रकार, अनधिकृत फेरीवाले यांच्यावर कारवाई करून नागरिकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आज दिली.सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा) यांनी सी. एस. आर. फंडामधून पुणे शहर पोलीस दलास नऊ चारचाकी वाहने (किया कॅरेन्स) रितसर खरेदी प्रक्रिया राबवून पोलीस दलाकडे सुपूर्द केली. वाहने हस्तांतरणाचा सोहळा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत आज (दि. २८) अमनोरा पार्क टाऊन क्लब, हडपसर येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. सिटी कॉर्पोरेशन लि. (अमनोरा)चे व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध देशपांडे यांनी वाहनांच्या चाव्या पोलीस आयुक्तांकडे या वेळी सुपूर्द केल्या. आदित्य देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



स्वागतपर प्रास्ताविकात अनिरुद्ध देशपांडे यांनी अमनोराच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, महिलांचे सबलीकरण, पाणी बचतीचा संदेश, आरोग्य, शिक्षण या क्षेत्रात कार्य केले जात आहे. आरोग्य उपक्रमांतर्गत १२०० महिला पोलिसांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. अमनोरा येथील घरेलु कामगार महिलांना (अवंतिका) » पान २ वर

# अतिवृष्टीग्रस्त भागासह शेरी पुलाची पाहणी

## तात्पर:एसडीएम वसिमा शेख यांचा आष्टी दौरा



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:महसूल खात्याच्या उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांनी मंगळवारी आष्टी तालुक्यातील काही अतिवृष्टीग्रस्त भागास भेट दिली. तसेच शेरी बुद्रुक येथील चार दिवसात तीनदा वाहून गेलेल्या पुलाची पाहणी करून वळण रस्ता त्वरित करण्याच्या निष्क्रिय ठेकेदाराला सूचना केल्या.

आष्टी तालुक्यातील बेलगाव , चिंचाळा, मांडवा सह विविध गावात अतिवृष्टीने मोठे नुकसान झाले आहे. यापैकी काही ठिकाणची मंगळवारी उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांनी भेट देऊन पाहणी » पान २ वर

## कशी केलती दैना

नियोजित वेळेच्या आधी १६ दिवस महाराष्ट्रासह मुंबईत मान्सूनचा पहिला पाऊस धोधो बरसल्याने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडाली. मुंबईची तुंबई झाली. जिकडेतिकडे पाणीच पाणी झाल्याने नागरिकांची 'आता जाऊ कुणीकडे' अशी स्थिती झाली. मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला असला तरी उत्तर कोकणातील रायगड, मुंबई, ठाणे जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारी पूर्व मोसमी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांना पावसाने जोरदार तडाखा दिला. त्यामुळे भीमा, नीरा, बाणगंगा या नद्यांना पूर आला. चंद्रभागेस पूर आल्याने पंढरपूरमध्ये दक्षतेचे आदेश देण्यात आले. सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्यातही पावसाने धुमाकूळ घातला. कोकणातील कुंडलिका, पाताळगंगा, सावित्री या नद्यांच्या पातळीत वाढ झाली. मुंबईत रविवारी रात्रीपासूनच सुरू झालेल्या पावसाने संततधार कायम ठेवत मुंबईची दाणादाण उडवली. पहिल्याच पावसात मुंबईची दैना झाली. रस्तेवाहतुकीचा बोजवारा उडाला, तर मध्य रेल्वेला जोरदार फटका बसला. हार्बर रेल्वेसेवा सीएसएमटी ते वडाळापर्यंत दुपारपर्यंत ठप्प होती. राज्यात पहिल्याच पावसाने दोन बळी घेतले. मुंबईत मे महिन्यात १०० वर्षांतील सर्वाधिक पावसाची नोंद झाली. इतिहासात मंत्रालयात प्रथमच पाणीच पाणी झाले,

तर काही दिवसांपूर्वीच उद्घाटन करण्यात आलेल्या वरळीतील आचार्य अत्रे चौक हे भूमिगत मेट्रो स्थानक जलमय झाले. मुंबईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या भुयारी मेट्रोच्या कामाची पहिल्याच पावसाने पोलखोल केली. ॲक्वा मार्ग–३ला पावसाचा फटका बसला. आचार्य अत्रे चौक वरळी मेट्रो स्थानकाच्या आत पावसाचे पाणी शिरले. भुयारी मेट्रो मार्गाच्या पाय–यांवरूनही पाणी वाहू लागल्याने हे मेट्रो स्थानक आहे की धबधबा असा प्रश्न निर्माण झाला. मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते जलमय झाले, झाडे कोसळली. राज्याचा कारभार चालणा–या मंत्रालयात इतिहासात प्रथमच गुडघाभर पाणी तुंबल्याने एकच तारांबळ उडाली. मंत्रालयात पाणी शिरल्याने महायुतीच्या कारभारावर ताशेरे ओढले गेले. मुंबईत १८ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्या. ३२ ठिकाणी झाडे कोसळली तर पाच ठिकाणी भिंत कोसळण्याच्या घटना घडल्या. मान्सूनचा तडाखा मुंबई, पुणे, सोलापूर, कर्नाटकातील कलबुर्गी, तेलंगणातील मेहबूबनगर आणि आंध्र प्रदेशातील कावलीपर्यंत बसला आहे. पुढील तीन दिवसांत मान्सून महाराष्ट्राच्या ब–याच भागात तसेच कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, बंगालचा उपसागर आणि ईशान्य भारतात आणखी वेगाने पुढे सरकेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरीत्या आढावा घेत आहेत.

नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मान्सूनचे केरळात १ जूनला तर मुंबईत १० जूनपर्यंत आगमन होईल अशी अपेक्षा होती. परंतु अनुकूल वातावरणीय परिस्थितीमुळे आठ दिवस आधीच केरळात मान्सूनचे आगमन झाले आणि अवघ्या २४ तासांत वा–याच्या वेगाने मान्सून महाराष्ट्रात पोहोचला. त्यामुळे मुंबईची अक्षरश: दाणादाण उडाली. मान्सूनचे आगमन जवळपास दहा ते बारा दिवस आधी झाल्याने मुंबई, कोकणसह महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाने दमदार हजेरी लावली. ऐन मे महिन्यात पाऊस आल्याने पावसाळ्याच्या जून–जुलै महिन्यात पाऊस असेल की नाही अशी शंका आतापासूच व्यक्त केली जात आहे. हवामान खाते पाऊस येणार असे सांगते आणि नंतर पाऊस येत नाही असा आजवरचा अनुभव होता. परंतु यावेळी मान्सून लवकर दाखल झाला, मग तो आता लवकर जाणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. यावर हवामानतज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर म्हणाले, पाऊस म्हणजे नळ नाही नळ चालू केला की पावसाला सुरुवात आणि बंद केला की पाऊस बंद असे होत नाही. पावसासाठी समुद्रात निर्माण होणारी स्थिती आणि भौगोलिक स्थिती या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात. वेळेआधी आलेला पाऊस आणि त्याच्या पीछेहाटीचा तसा कोणताही संबंध नाही. पावसाचा वेग विविध स्थितीवर अवलंबून असतो. पावसाचा आवेग ओसरला की, कदाचित एक–दोन दिवस तो पडणारही नाही.

पण पुन्हा पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली की पावसाचा जोर वाढेल. यंदा मोसमी वा–यांनी अत्यंत वेगाने केलेली वाटचाल दुर्मिळ असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. गत काही वर्षांत पाऊस येण्याचे निकष बदलले आहेत, पावसाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. पूर्वी उपग्रह नसताना अंदाज वर्तवण्याचे स्वरूप मर्यादित होते, आता उपग्रहामुळे अंदाज वर्तवण्याची क्षमता वाढली आहे. गत आठ वर्षे पाऊस सर्वसाधारण होता. त्यामुळे यंदा आलेला पाऊस लवकर वाटतो आहे. पाऊस लवकर आला म्हणजे फार काही वेगळे घडले असे नाही. यापूर्वी अशा घटना घडलेल्या आहेत. केरळमध्ये मोसमी वारे दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात येण्यासाठी आठ–दहा दिवस लागतात हे आपण माणसांनी ठरवले आहे. मात्र, निसर्गाची अनेक रहस्ये अजून उलगडलेली नाहीत. निसर्ग माणसांच्या नियमांनी चालत नाही, म्हणूनच दरवर्षी वेगळी करामत दिसून येते. त्याप्रमाणे पाऊस लवकरही येऊ शकतो हे निसर्गाने दाखवून दिले आहे. अंदाज वर्तवण्यात आव्हाने आहेत, ती असलीच पाहिजेत, त्यातूनच नवे काही शिकता येते, नवे काही घडू शकते. २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होईल असा अंदाज आहे. राज्यातील हवामान हळूहळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहील असा अंदाज आहे. देशातील इतर भागातसुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतक–यांनी पेरणीची घाई करू नये. कारण हवामान कोरडे होण्याची शक्यता असल्याने पेरणीची घाई केली तर शेतक–यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे कृषी विभागाने म्हटले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ यांच्या तत्परतेने

जालना येथील श्रीहरी मुजमुले या चिमुकल्याचे २५ जून २०२४ रोजी तब्बल ५ कोटी रुपयासाठी अपहरण झाले होते सामान्य लोकांसाठी महाराष्ट्र सेवक हि उपाधी आपल्या नावासमोर लावलेले महाराष्ट्रातील एकमेव संवेदनशील राजकीय नेते तथा मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्यापर्यंत हा विषय आल्यानंतर त्यांनी त्याच क्षणी जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तथा संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा कामाला लावून त्या मुलाची अवघ्या काही तासांतच अपहरणकर्त्याच्या तावडीतून सुटका केली होती रात्री योगायोगाने अपहरण झालेल्या व प्राण वाचलेल्या श्रीहरी मुजमुले ह्या चिमुकल्याने रात्री मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती प्रमुख डॉ ओमप्रकाशजी शेटे,आमदार अभिमन्यूभैय्या पवार, संतोष जाधव उपस्थित होते.



### एकाच कुटुंबातील सख्ख्या बहिण भावाला मदत

२२ जुन २०१८ रोजी मुजमुले कुटुंबातील धनश्री मुजमुले म्हणून तत्कालीन वय अवघे ४ वर्षे या चिमुकलीचं संपूर्ण हदय निकामी झाले होते त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री सध्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांनी या चिमुकलीवर तब्बल २५ लाख रुपयांची हदय प्रत्योरोपन शस्त्रक्रिया संपूर्ण मोफत करण्याचे आदेश त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे यांना दिले होते आज दोन्ही बहिण भाऊ मुख्यमंत्री देवेंद्रभाऊ फडणवीस यांनी केलेल्या संपुर्ण मदतीमुळे आनंदाने मनसोक्त जीवन जगत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संतोष जाधव,भाजप सोशल मिडिया प्रदेश कार्यकारिणी सदस्य**

# माजलगावातील भोगवटदारांची नावे मालकी हक्कात लावा

## शेख मंजूर यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

माजलगाव/प्रतिनिधी

माजलगाव शहरात भोगवटदारांची नावे मालकी हक्कात लावण्यात यावी.त्याचप्रमाणे मान्सुनपुर्व स्वच्छतेची कामे करावी.मंजरथ रोडवरील बंद पडलेल्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम तात्कळ सुरु करावे तसेच शहरातील अनेक प्रलंबित मागणी संदर्भात त्वरीत कार्यवाही करण्यात यावी यासह शहरातील नागरी समस्या संदर्भात माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,माजलगाव शहरामध्ये कचरवाडा व पावर हाऊस रोडच्या समोरील भाग पावर हाऊस रोड, दावल मलीक,बरकत नगर,इदगाह मोहल्ला,जुना बाजार रोड,इंदिरा नगर,तकीया,बिलाल मोहल्ला, कुरेशी गल्ली,आझाद नगर,गौतम नगर,रमाई नगर,याठिकाणी ३० ते ४० वर्षा पासुन १० ते १५ हजार कुटुंबीय राहतात,त्यांना मालकी हक्काचे कोणतेही कागद पत्रे नसल्याने शासनाच्या अनेक योजनांचा त्यांना लाभ मिळत नाही,जेणे करूण अनेक कुटुंबीयांना शासनांच्या विविध योजने पासुन बंचित राहाणे लागत आहे.ते शहराचे मतदार असताना देखील नगर परिषदेने त्यांना शासकिय योजना साठी कुठलीही ठोस कार्यवाही के लेली नाही.३० ते ४० वर्षापासुन हे लोक येथे वास्तव्यास असल्याने त्यांना पंतप्रधान आवास योजना किंवा माता रमाई आवास योजना यांचा



फायदा घेता आलेला नाहि.त्यांना मुलभूत सुविधा देखील मिळत नाहीत. गेवराई,परळी याठिकाणी अतिक्रमण नियमीत करुन भोगवट धाराच्या पिटीआर मालकी हक्कात देण्यात आलेल्या आहेत.त्यामुळे त्यांना अनेक योजनांचा लाभ भेटत आहे,तसाच लाभ माजलगाव शहरातील लोकांना देखील होइल. उदा.रस्ते, नाल्या,पिण्याचे पाणी, विद्युत कनेक्शन भेटत नाही, माजलगाव शहरामध्ये जवळपास १०% लोकांना राहण्यासाठी स्वताः चे घर नाही.काही लोक किरायाच्या घरात किंवा इतर ठिकाणी कठेही वास्तव्यास आहेत.नगर परिषदेच्या १३ एकर जमीनीमध्ये म्हाडा योजनेअंतर्गत या बेघर कुंटुंबीयांसाठी घरकुले बांधुन देण्यात यावीत.माजलगाव शहराच्या लोकसंख्येनुसार प्रत्येक प्रभागात नविन जोड स्वस्त धान्य दुकान स्थापन करुन वंचित नागरिकांना केशरी व पिवळ्या शिधाप्रत्रिका व स्वस्त धान्याचे वेळेवर वितरण करा.प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अनेक घरकुल धारकांनी त्यांच्या घराचे काम पूर्ण केलेले आहे.परंतु त्यांना अद्यापही घरकुलांचे उर्वरीत हाप्ते मिळालेले नाहीत. ते हाप्ते तात्काळ त्याच्या खात्यावर टाकण्यात यावेत. शहरातील प्रभागातील लहान बालके शिक्षणापासुन वंचित राहु नयेत म्हणुन प्रत्येक प्रभागात दोन अंगणवाडी,बालवाडी स्थापन करण्यात याव्यात.शहरातील मान्सुन पुर्व नाले सफाई करावी. नाल्यांची स्वच्छता नसल्यामुळे मुख्य रस्तावरील व्यापा–यांच्या दुकानात पावसाचे पाणी जात असल्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.न.प. मुख्याधिकारी शहरातील अत्यावश्यक बाबींकडे दुर्लक्ष करत आहेत,शहरात आजारांचे प्रमाण देखील वाढले आहे,मात्र याची मुख्याधिकाऱ्यांना जाणीव नाही.१५ व्या वित्त आयोगाच्या २०२२ च्या निधी मध्ये मंजरथ रोड याठिकाणी जलकुंभासाठी १ कोटी निधी व कार्यारंभ आदेश दिले होते.परंतु हा निधी इतरत्र वळवल्यामुळे या जलकुंभाचे काम २०२३ पासुन बंद आहे ते तात्काळ चालु करण्यात यावे. सादरील मागण्यासंदर्भातदि.२९/०९/२०२२ चा उपविभागीय कार्यालयावर काढलेला मोर्चा होता.मागण्यासाठी वेळोवेळी संबधित कार्यालयास निवेदन दिलेले आहेत.याची त्वरित दखल जिल्हाधिकारी महोदयांनी घ्यावी.व सदरील मागण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी दिलेल्या निवेदनात माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी केली आहे.

# गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

## धोरण: बीडमध्ये १२ उपकेंद्रावर ३४३० परीक्षार्थी

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ दिनांक ०१ जून २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ३ हजार ४३० उमेदवार बसलेले आहेत.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १२ उपकेंद्रप्रमुख १२ मदतनीस ५३ पर्यवेक्षक १६९ समवेक्षक असे एकूण २४६ अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २६ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतः च्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांच्या परीक्षा व उपकेंद्रावर परीक्षेकरिता सकाळी ०८.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळी ०९.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवास उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## पान एक वरून

**बीडमध्ये भारत जिंदाबाद**

छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे. भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे रिपाइं युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, साहील सवाई,योगेश वाघमारे,आनिकेत अरुण,राहुल कोकाटे, विशाल काबंळे, संकेत गायकवाड,आमोल जाधव, मिलिदं डोळस,निखिल ससाणे, नामदेव वाघमारे,ज्ञानेश्वर केंगार, वैभव गुलवेने,सिद्धेश्वर केंगार, शंकर येडवे, बालूराम केंगार, आदींनी केले आहे.

**जाहिर नाम्याची होळी**

मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांना लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा तांदळा येथे रविवारपासून सुरू असून अजय पाटील साळुंके हे उपोषणाला बसले आहेत. उपोषणाच्या चौथा दिवशी त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच त्यांना साखरेचा आजार असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. त्यांनी उपचार घ्यावे यासाठी तांदळा ग्रामस्थ व बाहेर ठिकाणहून आलेले शेतकरी त्यांना आग्रह करीत आहेत, मात्र शासन जो पर्यंत जायकवाडीच्या पाण्यासाठी ठोस भूमिका (उपाययोजना) करत नाही तो पर्यंत उपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या प्रकृतीला काही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. उपोषणाच्या चौथ्या दिवशी नायब तहसीलदार सुभाष कट्टे यांनी उपोषणस्थळी भेट दिली असता ठोस निर्णय न झाला नाही.यावेळी शेतकऱ्यांनी नायब तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

**नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस**

पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आले असून येत्या वर्षभरात शंभर कोटी लिटर पाणी बचतीचा संकल्प करण्यात आला आहे. खामगाव येथे पारधी मुलांच्या शाळेची जबाबदारी घेण्यात आली असून तेथील १५० विद्यार्थ्यांना कौशल्यविकास उपक्रमाअंतर्गत प्रशिक्षित करण्यात आले असून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले, शहर सुरक्षेसाठी पोलीस दल सतत कार्यरत असते. यात महिला पोलीस शक्तीचा मोठा वाटा आहे. त्यांच्या सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी महाराष्ट्रात प्रथमच पोलीस दलात किया कॅरेन्स ही वाहने उपलब्ध करून दिली आहेत. महिला पोलीस सारथ्य करत असलेल्या नऊ किया कॅरेन्सला पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अनिरुद्ध देशपांडे, आदित्य देशपांडे हिरवा झेंडा दाखविला व वाहने पोलीस दलात सामिल करून घेण्यात आली. अमितेश कुमार पुढे म्हणाले, पुण्यासारख्या सातत्याने विस्तारित होणाऱ्या शहरात नागरिकांच्या सुरक्षेसाठी कार्य करणे अवघड आहे; परंतु तंत्रज्ञान, मनुष्यबळ यांच्या मार्फत नागरिकांचे सुरक्षा, वाहतूकप्रश्न सोडण्यासाठी पोलीसदल कटीबद्ध आहे. नागरिकांनी आमच्या कामास सहकार्य करून सहभागही नोंदविल्यास पोलीस दलाची कार्यक्षमता वाढण्यास तसेच शहराला शिस्त लागण्यास मदत होईल. नागरिकांनी मोकळेपणाने आपल्या अडचणी आणि प्रश्न ११२ या क्रमांकावर पोलीस विभागाकडे मांडावे. प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत पाठपुरावा करत रहावा. आम्ही त्याचे कायमस्वरूपी निराकरण करण्याचा प्रयत्न करू. या परिसरात रस्त्यावर, पादचारी मार्गांवर स्पिकरवर मालाचा भाव सांगत, आरडाओरडा करून वस्तूंची विक्री करणारे फेरीवाले पाहण्यात आले. अशा प्रकारे रस्तेवाहतूक आणि नागरिकांना त्रासदायक ठरणाऱ्या विक्रेत्यांवर योग्य ती कारवाई करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. सूत्रसंचालन स्नेहल जाधव, तहसीन बेग यांनी केले तर आभार डॉ. राजकुमार शिंदे यांनी मानले.

**अतिवृष्टीग्रस्त भागासह शेरी**

केली. तसेच या भागात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी (तलाठी ) यांना केल्या आहेत. त्यानंतर त्यांनी शेरी बुद्रुक येथील वळण रस्त्याच्या कामाची पाहणी केली. या पुलाच्या नळ्यांची संख्या वाढवून हा वळण रस्ता लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचना संबंधित रस्ता काम करणाऱ्या ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांना दिल्या. यावेळी मंडळ अधिकारी नवनाथ औंदकर, ग्राम महसूल अधिकारी मोहन पाचंगे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

## पान सहा वरून

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर**

रवि कांदे, प्रकाश जोशी, नितीन समशेट्टे, अरूण पाठक, मोहन जोशी, बळीराम गडदे, चंद्रकांत देवकते, संजय मुंडे, प्रशांत कराड, प्रितेश तोतला, आश्विन मोगरकर, अनिश अग्रवाल, सुशील हरंगुळे, राजेंद्र ओझा, ज्ञानोबा सुरवसे, सचिन गिते आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बियाण्यासाठी शेतकऱ्यांनी अर्ज**

होणार आहे. तर महाडीबीटी – शेतकरी योजना या पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने सादर केलेले अर्ज हे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या पद्धतीने बियाणे सोडतसाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. सोडतमध्ये निवड झालेल्या शेतकरी लाभार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर निवडीचा संदेश देण्यात येणार असून निवड झालेल्या लाभार्थ्यांना अनुदानित बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अनुदानित बियाण्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी २९ मे पर्यंत महाडीबीटी – शेतकरी योजना या पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन केजचे तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी केले आहे.

**सरपंच ॲड. नारायण शिंदे शिवसेनेचे**

गेवराईचे नवनिर्वाचित तालुकाप्रमुख उद्धव मडके, नवनाथ गवते, मुकेश महाजन, गणेश शिराळे, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.दरम्यान ॲड नारायण शिंदे हे विधिज्ञ असून गेवराई तालुक्याच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात ते सक्रिय असून गेल्या २ वर्षांपूर्वी झालेल्या नागझरी ग्रामपंचायत निवडणुकीत त्यांनी अपक्ष निवडणूक लढवून दणदणीत विजय मिळवून एकहाती सत्ता काबीज करत गावकऱ्यांचा विश्वास कमावला असून गावात विविध विकास कामे खेचून आणत विकासाला चालना दिली. दरम्यान अलीकडच्या काळात गावासह परिसरातील विकास कामे झाली पाहिजेत यासाठी त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यासमवेत काम करण्यास सुरुवात केली. याची दखल वरिष्ठांनी घेऊन त्यांना जिल्हाभरात पक्ष वाढीचे काम करण्याची संधी देत थेट उपजिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली असून येणाऱ्या काळात त्यांचा फायदा शिवसेना पक्षाला होईल असे दिसत असून त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**कापरेवाडीत शाळेत शिरले**

खुप विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व गावातील विद्यार्थी अजारी पडनार असतील तर शाळेचा उपयोग काय व शिक्षण घेऊन तरी उपयोग काय त्यामुळे गावातील शाळा सुंदर तर गाव सुंदर त्यामुळे संमंधीत प्रशासनाने तातडीने शाळेत जाणारे पाणी पाऊसाचे नालीचे पानी थांबवले पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**धार्मिक ऐक्यासाठी उल्लेखनिय**

आडगांवकर, ड.प्रशांत देशपांडे, ड.अमित हसेगावकर, ड.जितेंद्र पांडव, संतोष चिंचोलकर, त्रिंबक देशपांडे, डॉ.मनोज पोहणेरकर, संतोष पारगावकर, डॉ. स्वप्नील उन्हाळे, वल्लभ गोडबोले, दीपक रुपदे, ड.आनंद पाटील, डॉ.राजेश भुसारी, संदीप खडकिकर, विजय कोटुळे, गंगाधरराव देशमुख, राम कुलकर्णी, मिलिंद शिवणिकर, डॉ.विनोद मुळे, एकनाथ टेपाले, हेमंत जोशी, राहुल भालेराव, ड. नरेंद्र जवळेकर, मुकुंद कुलकर्णी, अभिजित वैद्य, प्रसाद अंदुरकर, सुनील देशमुख, संजय डोळे, प्रकाश गोरकर, डॉ. छत्रपती वैरागर, नरेंद्र देशपांडे, रत्नाकर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, प्रकाश चैतन्य, वैभव देशमुख, सुनील खजानदार, संतोष जोशी आदी सावरकरप्रेमी नागरिक उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## हाय सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य

**ठाणे :** ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाच्या वतीने वाहतूक नियमांचे पालन करत, सुमारे ९० पत्रकारांनी वाहनांवर HSRP नंबर प्लेट बसवून, स्तुत्य उपक्रम राबवला आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नव्या अधिनियमांनुसार सर्व वाहनांवर HSRP लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्या आनुषंगाने पत्रकार संघाने पुढाकार घेत समाजापुढे एक अनुकरणीय उदाहरण ठेवले. देशातील सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) बसवण्याचे अनिवार्य केले आहे. त्यामुळे मार्च २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना नवी नंबर प्लेट बसवण्यासाठी ३० जून अंतिम मुदत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाने नवीन नंबर प्लेट बसवण्याच्या उपक्रमात संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, कार्याध्यक्ष विकास काटे, सचिव निलेश पानमंद आणि कार्यकारिणी सदस्यांनी आणि पत्रकारांनी मिळून सुमारे ९० वाहनांवर HSRP नंबर प्लेट्स बसवून घेतल्या असून वाहतूक शिस्तीचा आदर्श घालून दिला. ''वाहतूक नियमांचे पालन केवळ गरज नाही, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे,'' असे मत अनेक पत्रकारांनी यावेळी व्यक्त केले.

## वेचक

### घनकचरा कर लादल्याने नागरिक नाराज

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महापालिका प्रशासनाने घनकचरा व्यवस्थापनासाठी नव्या एजन्सीची नियुक्ती करत असतानाच सोयी-सुविधांकरिता आकारण्यात येत असलेल्या घनकचरा शुल्कात भरमसाठ वाढ केली आहे. सामान्य घरांसाठी शुल्क सहाशेवरून थेट ९०० केले तर वाणिज्य आस्थापनांकडून शुल्कात शंभर टक्के वाढ केली आहे. ही केलेली वाढ चालू वर्षांपासून आकारण्यात येणार आहे. महापालिकेने सात प्रभाग क्षेत्रातील घनकचरा संकलन, वाहतूक आणि व्यवस्थापन हे काम दहा वर्षांसाठी सुमित एल्कोप्लास्ट या कंपनीला दिले आहे. पालिका कंपनीला वर्षाला पंचाऐंशी कोटी देणार आहे. सदर घनकचरा शुल्कात वाढ केल्याने दिपेश म्हात्रे यांनी पालिका प्रशासनासह सत्ताधारी यांच्यावर टीका केली आहे. जागरूक नागरिक फाउंडेशनचे श्रीनिवास घाणेकर यांनी म्हटले आहे की, करवाढ नसलेला अर्थसंकल्प आयुक्तांनी सादर केला. पण घनकचरा नावाने शुल्कवाढ केली. त्याचा भुर्दंड सामान्य नागरिकांना सोसावा लागणार आहे.

### १७३ निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान



**कल्याण :** संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने, संत निरंकारी सत्संग भवन, भाईंदर पूर्व येथे रविवारी एका भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सतगुरू माता सुदीक्षाजी महाराज यांची दिव्य शिकवणूक आत्मसात करत मुसळधार पावसाची तमा न बाळगता 'रक्त नाड्यांमधून वाहावे, नाल्यांमध्ये नको' या दिव्य संदेशाने प्रेरित १७३ निरंकारी भक्तांनी या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले, ज्यामध्ये १३० पुरुष तर ४३ महिला रक्तदात्यांचा समावेश होता. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले यांनी या शिबिरामध्ये रक्त संकलन केले. कार्यक्रमाला मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष रवी व्यास आणि माजी नगरसेवक प्रविण पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढविला व संत निरंकारी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतुकही केले. स्थानिक सेवादल युनिट आणि एसएनसीएफचे स्वयंसेवक यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

### भिवंडी महानगरपालिकेतर्फे कर्करोग तपासणी

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागांतर्गत अवचितपाडा नागरी आरोग्य केंद्र या ठिकाणी ३० मे आणि ३१ मे २०२५ म्हाडा कॉलनी नागरी आरोग्य केंद्र असे दोन दिवस सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत कर्करोग तपासणीचे रुग्णवाहिकाद्वारे आयोजन करण्यात आलेले आहे. भिवंडी महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील ३० वर्षे महिलांची स्तनाचा कर्करोग व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग तपासणी करण्यात येणार आहे. तसेच ३० वर्षे महिला व पुरुषांच्या मुखाचा कर्करोग तपासणीचे आयोजन केले असून यावर तपासणी व औषधोपचार करणेसाठी शासन स्तरावरून वैद्यकिय पथक येणार आहेत. या कामी संबंधीत नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी, परिचारीका यांचे मार्फत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग व प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

### रायते पुलावर वाहतूक सुरळीत सुरू!

**मुरबाड :** मुरबाड-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर गेली दोन दिवस मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे.



त्यामुळे रायते ब्रिजवर असणाऱ्या उल्हास नदीच्या पाण्यात वाढ होत चालल्याने सुरक्षेच्या दृष्टीने वाहतुकीसाठी सोमवारी रस्ता बंद करण्यात आलेला होता. परंतु उल्हास नदीचे पाणी ओसरत चालले आहे. त्यामुळे मुरबाड -कल्याण या राष्ट्रीय महामार्गावरील रायते पुलावरील वाहतूक सुरळीतपणे सुरू झाली आहे. तसेच आज पावसाने विश्रांती घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.

# नागरिकांची सुरक्षा सगळ्यात महत्त्वाची

आपत्ती कक्षाला भेट देत उपमुख्यमंत्र्यांनी यंत्रणांना दिल्या सतर्कतेच्या सूचना

◆ **ठाणे ( प्रतिनिधी) :**



राज्यातील मान्सूनच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर हवामान खात्याने ठाणे जिल्ह्यासाठी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. नागरिकांची सुरक्षा सगळ्यात महत्त्वाची असून त्यासाठी सर्व यंत्रणा सतर्क आहेत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला भेट दिल्यावर केले. शून्य जीवितहानी हे आपले लक्ष्य आहे. त्यामुळे कोणतीही परिस्थिती उद्‌भवली, तक्रार आली तर कमीत कमीत वेळेत प्रतिसाद देऊन, यंत्रणांनी मदतीसाठी तत्पर असावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. गेल्या काही वर्षांच्या अनुभवावरून ठाणे महापालिकेने पावसाळ्यातील स्थितीचा चांगल्या पद्धतीने सामना केला आहे, असेही ते म्हणाले.

ठाणे महापालिकेचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत आहे. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची दोन सत्रांमध्ये नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रभाग समिती स्तरावरही कार्यपद्धती तयार करण्यात आलेली आहे. तेथे मनुष्यबळ, वाहन, जेसीबीची उपलब्धता आहे. साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी ३८ ठिकाणी उच्च क्षमतेचे ६६ पंप बसवण्यास आलेले आहेत. आतापर्यंत एकूण १३५ मिमी पाऊस झाला. पण पाणी साठण्याच्या तक्रारी आलेल्या नाहीत. जिथे थोडेफार होते तेही पंपांच्या मदतीने काढण्यात आले, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. ठाणे महापालिका क्षेत्रात, ६ ठिकाणी पर्जन्यमापक, ६ नाल्यांवर फ्लड सेंसर कार्यरत आहेत. ४३ संभाव्य ठिकाणी पाऊस पडत असताना कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच, २९ जवानांचे टीडीआरएफ पथकही तैनात असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. सी वन गटातील अतिधोकादायक ९० इमारतींपैकी ४२ इमारती रिकाम्या आहेत. ६ इमारतीतून रहिवाशांना इतरत्र हलवण्यात आले आहे. तसेच, १९७ कुटुंबांना स्थलांतरित करण्याचे काम सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. शासनाकडून येणाऱ्या संदेशावर लक्ष ठेवावे. तसेच, असुरक्षित स्थळी आसरा घेऊ नये, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. यावेळी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कामाची माहिती घेतली. त्याप्रसंगी, खासदार नरेश म्हस्के, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त जी. जी. गोदेपुरे, मनीष जोशी, अनघा कदम आदी उपस्थित होते. ठाणे महापालिका आयुक्त पदाचा अतिरिक्त पदभार सध्या जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे आहे.

मुंबई - ठाणे परिसरात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर खासदार नरेश म्हस्के यांच्यासह जिल्हाधिकारी शिनगारे यांनी ठाणे महापालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षास भेट दिली. यावेळी, त्यांनी महापालिकेचे सर्व उपायुक्त, सर्व प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता यांची ऑनलाईन बैठक घेतली. आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कामाचा आढावा घेतला. पहिलाच मोठा पाऊस असून नाल्यात साठणारा, डोंगर भागातून वाहून येणारा तरंगता कचरा तत्काळ काढण्यात यावा. तसेच, पाणी साठण्याच्या नेहमीच्या ठिकाणांवर अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे असे निर्देश या बैठकीत खासदार नरेश म्हस्के यांनी दिले. तसेच, नाले सफाईची कामे पूर्ण करणे, सी-वन गटातील अतिधोकादायक इमारती रिकाम्या करणे, आवश्यक ती रस्ते दुरुस्ती तत्काळ करणे आणि वृक्षांच्या धोकादायक फांद्यांच्या छाटणीचे काम जलद करणे या चार मुद्द्यांवर सगळ्यांनी अधिक लक्ष द्यावे. तसेच, नैसर्गिक आपत्ती ओढावली तर तत्काळ प्रतिसाद देणे, याला प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या बैठकीत दिले. ठाणे महापालिका क्षेत्रात कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

### नदीच्या पुलाला संरक्षण कठड्यांचा अभाव

# न्याहाडी नदीचा पूल, बनलाय मृत्यूचा सापळा

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड तालुक्यातील आदिवासी डोंगराळ भागात असलेल्या न्याहाडी, चासोळे व हेदवली पुलांना संरक्षक कठडे नाहीत, या पुलांवरुन दुर्गम भागातील विद्यार्थी, नोकरदार, शेतकऱ्यांना नाईलाजाने प्रवास करावा लागत आहे. मात्र अरुंद पुलामुळे वाहन चालकांना अंदाज येत नसल्याने वेळोवेळी अपघाताला सामोरे जावे लागत असल्याने हे पूल म्हणजे मृत्युचा सापळा बनले आहेत. प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्याने परिसरातील हजारो संतप्त नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या पुलावरील नदीला पूर आल्यानंतर येथील गावांचा शहरांशी संपर्क तुटतो. तसेच पुलांना संरक्षक कठडा नसल्याने मोठी दुर्घटना घडण्याची भीती असते. पावसाळा सुरू होण्यापूर्वी हेदवली, चासोळे व न्याहाडी पुलावर संरक्षण कठडे न उभारल्यास करचोंडे, चासोळे, मेर्दी न्याहाडी व वाल्हीवरे ह्या ग्रामपंचायतीमधील सर्व नागरिकांच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभाग मुरबाड येथे उपोषण करून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाचे माजी चेअरमन प्रकाश पवार, जिल्हा परिषद ठाणेचे माजी सदस्य संजय पवार,



> सदर पुलावर होणारी वाहतूक आणि त्यामुळे वेळोवेळी होणाऱ्या अपघातावर मात करण्यासाठी लवकरच त्या पुलाचे दोन्ही बाजूला लोखंडी कठडे तयार केले जातील
> - **कैलास पतींगराव,** उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग मुरबाड

आदिवासी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ खाकर सर, मेर्दी ग्रामपंचायत सरपंच पांडुरंग दरवडा, सामाजिक कार्यकर्ते अशोक पठारे व संतोष देशमुख यांनी दिला आहे.

आदिवासी गाव-पाड्यामधील मोठ्या प्रमाणात नागरिक चासोळे,हेदवली व न्याहाडी पुलावरू न ये-जा करीत असतात. या तिन्ही पुलांवर संरक्षण भिंत किंवा लोखंडी रेलिंग उभारण्यासंबंधीचे पत्र १३ जुलै २०२३ रोजी समाजसेवक प्रकाश पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांना दिले असताना आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. हेदवली पुलाची अवस्था फारच दयनीय झाली आहे.

### आज डोंबिवलीत स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्सव

**डोंबिवली :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ डोंबिवली विभागातर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. तसाच ह्यावर्षी देखील स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था, डोंबिवली शाखेतर्फे आज २८ मे २०२५ रोजी, सर्वेश हॉल, ताई पिंगळे चौक, डोंबिवली पूर्व येथे संध्याकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत हा जयंती उत्सव जोशात साजरा होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक काळाराम मंदिर येथील महंत सुधीर दासजी उपस्थित राहणार असून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भुषवतील आणि स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी, अभ्यासक आणि प्रथितयश वक्ता, पार्थ बावस्कर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले जावे ह्या साठी सह्यांची मोहीम ही याठिकाणी राबवली जाणार आहे.

### कोसळलेली भिंत बांधून घेण्याची मागणी

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिकेच्या नगर भवन या इमारतीच्या लगतच असलेल्या मांदली तलावाची भिंत ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे कोसळल्याचे निष्पन्न झाले आहे. ती ठेकेदाराच्या स्वखर्चातून बांधून घ्यावी तसेच त्याला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी मनसेने केली असून अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

भाईंदर पश्चिम भागात मांदली तलाव असून बाजूलाच नगरभवन ही महापालिकेची इमारत १९९४ पासून असून सध्या त्यात आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, प्रभाग समिती कार्यालय असे महत्वाचे विभाग कार्यरत आहेत. तलाव व इमारतीस ३३ वर्षे झाल्याने महापालिकेने स्ट्रक्चरल ऑडीट केले होते. तलावाच्या भिंती दगडाच्या असल्याने त्यांची पुर्नबांधणी करणे, तलावातील गाळ काढणे इ. कामासाठी स्पार्क सिव्हिल इन्फ्रा प्रोजेक्ट कं. ला ठेका देण्यात आला होता. सदर कंपनीचे काम सुरू असताना ठेकेदाराने



सुरक्षेच्या उपाययोजना करून योग्य ती काळजी न घेतल्यामुळे तलावालगत असणारी सुरक्षा भिंत कोसळून भिंती लगतचा इमारतीकडे जाणारा रस्ता खचला जाऊन मोठी दुर्घटना घडली होती. घटनेनंतर नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर कंत्राटदाराकडून ५ लाख रुपये दंड वसुल करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. परंतु दोन्ही बाजूच्या संरक्षण भिंती त्याच्या स्वखर्चातून बांधून घेण्यात याव्यात तसेच शासन नियमाप्रमाणे दंड आकारून अपघातासाठी भारतीय दंड संहिता नुसार गुन्हा नोंद करावा अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली असून अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## उल्हास नदीने ओलांडली धोक्याची पातळी

### नागरिकांना सर्तकतेचा इशारा

◆ **बदलापूर (वार्ताहर) :**

आधी उन्हाच्या झळांनी असह्य केले आणि आता ऐन उन्हाळ्यात बदलापूरसह अनेक जिल्ह्यांना पावसाने झोडपून जनजीवन विस्कळीत केले. सोमवारी पहाटेपासून कोसळणाऱ्या पावसाने उल्हास नदी दुथडी भरून वाहू लागली. दुपारी नदीने धोक्याची पातळीही ओलांडली. त्यामुळे बदलापुरात पूरपरिस्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र दुपारनंतर पावसाचा जोर ओसरला आणि संध्याकाळी पाण्याच्या पातळीत मोठ्या प्रमाणात घट झाली.

बदलापूर परिसरात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सुरू होता. त्यात रायगड जिल्ह्यातील कर्जत माथेरान पट्ट्यातही पावसाचा जोर असल्याने सकाळपासून उल्हास नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होत गेली. दुथडी भरून वाहत असलेल्या उल्हास नदीच्या पाण्याची पातळी वाढून उल्हासनदीने १७.५० मी ही धोक्याची पातळीही ओलांडली.



त्यानंतरही पाऊस सुरूच असल्याने बदलापुरात पूरपरिस्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली होती. मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी सकाळपासून शहराच्या भागात फिरून परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांच्या मदतीसाठी सज्ज राहण्याच्या सूचना नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. उद्‌घोषणा करून नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. उल्हासनदीने धोक्याची पातळी ओलांडल्यानंतर खबरदारी म्हणून काही वेळ उल्हासनदी पूल रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. नदी परिसरात अग्निशमन दलाचे कर्मचारी तैनात करण्यात आले होते. पोलिसांनीही चोख बंदोबस्त ठेवला होता. उल्हास नदी परिसरात ठिकठिकाणी शहरांसह गावे मोठ्या प्रमाणात विस्तारली आहेत. पाऊस असाच राहिला तर या गावांना ही सतर्कतेचा इशारा दिला जाऊ शकतो. त्यामुळे नदी काठावर, डोंगराळ भागात, धबधब्याचे ठिकाणी, नदीच्या पाण्यात, धरण क्षेत्र आधी ठिकाणी पावसाच्या कालावधीत नागरिकांनी जाण्याचे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तक्रारींसह संघर्ष शिष्टमंडळाने घेतली आयुक्तांची भेट

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

समस्या सोडविण्याचे आयुक्त अभिनव गोयल यांचे आश्वासन

कल्याण-डोंबिवली महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावातील समस्या कायम असून या समस्याबाबत मंगळवारी संघर्ष समितीच्या वतीने पालिका आयुक्त गोयल यांची भेट घेतली. यावेळी २७ गावातील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, पायवाटा, गटारे यासारख्या मुलभूत सोयीसुविधांबाबतचा पाढा आयुक्तांसमोर वाचत, आयुक्तांनी या भागातील दौरा करून समस्या समजावून घ्याव्यात अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी आयुक्तांनी दौरा करण्या बरोबरच या मुलभूत समस्या सोडविण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्याचे आश्वासन दिले.

या भागातील शाळा आणि आरोग्य सेवा जिल्हापरिषदेच्या नियंत्रणाखाली असल्याने या



भागात सुविधा मिळत नसून शिक्षणाच्या सुविधा देखील अपुऱ्या असल्याने शाळा आणि आरोग्य सेवा पालिकेत समावून घेण्याची मागणी करण्यात आली. याबाबत शासन स्तरावर चर्चा करून पर्याय काढण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

तर सावळाराम म्हात्रे स्मारकासाठी जागा आणि निधी मंजूर करण्यात आल्याने स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची मागणी करण्यात आली. मेट्रोच्या कामामुळे होत असलेली वाहतूक कोंडी आणि नव्या कचऱ्याच्या ठेकेदाराने शहरातील आणि ग्रामीण भागातील गरजू मुलांना या कामात सामवून घेण्यासाठी सूचना देण्याची मागणी देखील करण्यात आली. याबाबत आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे संघर्ष समितीचे उपाध्यक्ष गुलाब वझे यांनी संगितले.

## 'शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या'

**शहापूर :** भातसा धरणाच्या उजव्या कालव्याद्वारे सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर घेतलेल्या भात पिकांची पावसाच्या पाण्याने नासाडी झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून थैमान घातलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भातपिकांचे तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांनी शहापूरच्या तहसीलदारांकडे केली आहे. शहापूर तालुक्यातील आवरे, कांबारे, चेरपोली, कवडास, तूते, अर्जुनली, पिंपळपाडा, काळेपाडा, सरलांबे, साजिवली, सावरक्षेत, खुटारी या गावांमधील शेतकरी उजव्या कालव्याद्वारे सोडण्यात येणाऱ्या पाण्यावर उन्हाळी भात पीक तसेच भाजीपाल्याचे पीक घेत असतात.

यावर्षी अवकाळी पावसामुळे तसेच भातसा धरण विभागाने शेतकऱ्यांनी विनंती करूनही १ मे रोजी कालव्याचे पाणी बंद न केल्यामुळे भात शेती तसेच पालेभाज्या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. शेतक-यांचे भाताचे उभे पिक शेतात भिजत पडले आहे. शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यात यावी, अशी मागणी शहापुरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्याकडे केली आहे.

## 'अतिदुर्गम भागात वीजरोधक मनोऱ्याची गरज'

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यातील अतिदुर्गम पठारी भागातील खेड्या-पाड्यात दरवर्षी वीज अंगावर कोसळून मोठ्या प्रमाणात वित्तीय व जीवितहानी होण्याच्या घटना घडत असल्याने या भागात वीजरोधक मनोरे बसविण्यात यावेत अशी मागणी श्रमजीवी संघटनेचे शहापूरचे सचिव प्रकाश खोडका यांनी केली आहे.

तालुक्यातील खर्डी दहिगाव, भोसपाडा, शिरोळ, बिरवाडी, अजनुप, धामणी, अघई, वेळुक वाशाळा तसेच टाकीपठार परिसरातील सावरोली, सोगाव, कानडी, आपटे, खराडे, ढाढरे, डेहणे, नडगाव, खरिवली, किन्हवली या ग्रामपंचायतींच्या अंतर्गत येणा-या सुमारे २५-३० गावपाड्यांना दरवर्षी चक्रीवादळ, वीज कोसळणे अशा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. शहापुर तालुक्यात वीज पडून दर वर्षी अनेकांचे बळी जात असून यावर ठोस उपाय योजना करण्यासाठी तालुक्यातील वीज पडत असलेल्या परिसरात वीजरोधक मनोरे बसविण्यात यावेत', अशी मागणी श्रमजीवी संघटना, शहापूरचे, सचिव प्रकाश खोडका यांनी केली आहे. या वर्षात ५ जणांचा वीज पडून मृत्यू तर २ जण जखमी झाले. दरम्यान शहापूर तहसीलकडून तालुक्यातील प्रत्येक मंडळ अधिकाऱ्यांच्या क्षेत्रात एक व किनव्हली परिसरात दोन विजरोधक मनोरे बसविण्यात यावे यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठवण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांनी घेतली पालिका आयुक्तांची भेट

## नवी मुंबईत ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाटांसह जोरदार पाऊस

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

नवी मुंबईत ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाटासह रात्रीपासून कोसळलेल्या अतिवृष्टीचा आढावा घेण्याकरीता आमदार मंदा म्हात्रे यांनी भारतीय जनता पार्टीचे शिष्टमंडळ व सीबीडी येथील व्यापारासंह नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची भेट घेतली.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, नवी मुंबईमधील बेलापूर विभागातील सेक्टर १२ येथे असलेले सिडको निर्मित पावसाळी जलउदंचन केंद्र (पंप हाऊस)




हे गेले ३५ ते ४० वर्षे जुने असून त्याचे भूमिपूजन होऊन देखील वर्षे झाली आहेत, परंतु अद्यापपर्यंत काम पूर्ण न झाल्याने अतिवृष्टीमुळे नवी मुंबईत व विषेशतः सीबीडी बेलापूर विभागात सखल भागात असलेल्या सेक्टर ४,५,११ येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले. तीन दिवस सुरू असलेल्या संततधार पावसाने पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नागरिकांच्या मनात काही अंशी भीतीचं वातावरण पसरलं होतं. याच पूरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळासहित नुकतेच महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून त्यांना निवेदन दिले. तसेच जेव्हा पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते तेव्हा त्याचा फटका रहिवाशांना व वाहतुकीवरती मोठ्या प्रमाणात बसतो. गेल्या काही दिवसांपासून मान्सूनपूर्व पाऊस जसा कोसळत आहे त्याचप्रमाणे आगामी मान्सूनमधील पावसाचा अंदाज पाहता मान्सून काळात आपत्तीवर सर्व विभागांनी समन्वयाने मात करण्यासाठी व नागरिकांना दिलासा देण्यासाठी सर्व सुविधा पुरवण्याचे नियोजन करण्याचे निर्देश आमदार मंदा म्हात्रे यांनी महापालिका आयुक्तांना दिले. त्याचप्रमाणे पूरनियंत्रण कक्ष, आपत्ती व्यवस्थापनाच्यावतीने नागरिकांच्या जीविताचे रक्षणाच्या अनुषंगाने वाशी येथील पावसाळी जलउदंचन केंद्राचे ही काम लवकरात लवकर करावे. तसेच नवी मुंबईमध्ये राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा या विषयावरही सकारात्मक चर्चा आमदार मंदा म्हात्रे यांनी पालिका आयुक्तांसोबत केली.

## 'ओळख हक्क व अधिकाराची' पुस्तकाचे प्रकाशन

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी निगडित असलेल्या परिपत्रकांची शासकीय भाषा सामान्यांना समजण्यास कठीण असते. परंतु आता ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने ही समस्या दूर करण्याचा प्रयत्न करत सामान्यांच्या सोप्या भाषेत 'ओळख हक्क व अधिकाराची' या कायदेविषयकाची माहिती देणाऱ्या पुस्तकाची निर्मिती केली असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायधीशांच्या हस्ते ते प्रकाशित करण्यात आले आहे. ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश ईश्वर सूर्यवंशी यांनी लिहिलेल्या या पुस्तकाचा सर्वसामान्यांना चांगला लाभ होईल असा विश्वास



यावेळी न्यायाधीशांकडून व्यक्त करण्यात आला आहे. सदर पुस्तक विनामूल्य असून ते ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे मिळणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने त्याचे वितरण राज्यातील सर्व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समितीकडे मिळेल. या पुस्तकात : विधी सेवा प्राधिकरण= रचना व कार्ये, वैकल्पिक वाद निवारण पद्धती, मनोधैर्य योजना, फौजदारी गुन्ह्यांमध्ये बळी पडलेल्या व्यक्ती करता नुकसान भरपाई योजना, महाराष्ट्र लैंगिक अत्याचार / इतर गुन्ह्यांमधील पीडित /त्यातून बचावलेल्या महिलांना नुकसान भरपाई देण्याबाबत योजना २०२२, हिट अँड रन मोटार अपघात नुकसान भरपाई योजना, न्याय चौकशी अधीन बंदीचे अधिकार व जामीनावर मुक्तता होणे बाबत तरतुदी, न्यायाधीन बंदी पुनरावलोकन समिती, कारागृहातील वंचित व गरीब बंद्यांना सहाय्यभूत योजना, विधी सहाय्य बचाव पक्ष प्रणाली या विषयांवरील सामान्यांना समजेल अशा भाषेत माहिती दिली.

# केंद्रीय आस्थापनांत मराठी अनिवार्य; स्वागतार्ह निर्णय

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर आता बंधनकारक करण्याबाबतचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने काढला. त्यामुळे यापुढे महाराष्ट्रातील केंद्र सरकारच्या सर्व कार्यालयांमध्ये, बँका, विमा कंपन्या, रेल्वेसह केंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या कार्यालयांमध्ये इंग्रजी, हिंदीसह मराठी भाषेचा वापर सक्तीचा करण्यात येईल, ही स्वागतार्ह बाब आहे. केंद्राच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील सर्व कार्यालयात हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर करण्याबाबतची कार्यालयांनी दर्शनी ठिकाणी सूचना फलकावर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या सर्व ठिकाणी मराठी वापरली जात आहे की नाही? या संदर्भात पाठपुरावा करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर देण्यात आल्यामुळे, या परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी अशी महायुती सरकारची प्रामाणिक इच्छा असल्याचे दिसून आले आहे.

महाराष्ट्र राजभाषा कायदा १९६४ नुसार महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी आहे. मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्यात यावा, यासाठी राज्य सरकारकडून या आधी अनेक आदेश जारी करण्यात आले आहेत; परंतु असे अद्यादेश, परिपत्रके ही सरकारी दफ्तरी लालफितीत गुंडाळली गेली आहेत, हे नव्याने सांगायला नको. या उदासीनतेतून, राज्यातील राष्ट्रीय बँका, दूरसंचार विभाग, पोस्ट ऑफिस, आयुर्विमा कार्यालये, रेल्वे, मेट्रो, मोनो रेल, विमान कंपनी, गॅस, पेट्रोलियम, आयकर कार्यालय इत्यादी ठिकाणी सेवा देणारी कार्यालये, केंद्र सरकारची इतर कार्यालये इत्यादी ठिकाणी मराठीचा वापर होत नसल्याच्या तक्रारी वारंवार होताना दिसल्या.

गेल्याच आठवड्यात कर्नाटकात स्टेट बँकेच्या एका महिला कर्मचाऱ्याने कानडीत बोलण्यास नकार दिल्यानंतर थेट मुख्यमंत्र्यांनीच तक्रार करून संबंधित कर्मचाऱ्याची राज्याबाहेर बदली करण्यास भाग पाडले होते. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका शाखेत ग्राहकाशी बोलताना एका अधिकाऱ्याने कन्नड बोलण्यास नकार दिला होता. त्यामुळे कर्नाटकात कन्नड विरुद्ध हिंदी असा नवीन एक वाद निर्माण झाला आहे. या प्रसंगाचा एक व्हीडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. त्यानंतर कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या प्रकरणाची दखल घेत, स्टेट बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. संबंधित महिला बँक अधिकाऱ्याची दुसऱ्या राज्यात बदली करण्यात आली. मात्र, अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी सर्व बँक कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी सौजन्याने वागले पाहिजे. त्यांच्याशी त्यांनी स्थानिक भाषेत बोलण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करायला हवा, असे सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केले होते. कर्नाटकातील भाषिक वादाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मराठी सक्तीचा मुद्दा मनसेकडून उचलून धरण्यात आला होता. त्यामुळे राज्य सरकारकडून तातडीने काढलेल्या या परिपत्रकामुळे, महाराष्ट्रात काम करणाऱ्या केंद्रीय आस्थापनांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना जरब बसणार आहे. त्याचे कारण, परिपत्रकात कडक भाषा वापरल्याचे दिसून आले आहे. केंद्र शासनाच्या कार्यालयांमध्ये मराठीचा वापर करण्यात येतो का, याची पडताळणी करावी. मराठीचा वापर करण्यात येत असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र घ्यावे. कार्यालयांमध्ये स्वयंघोषणापत्र दर्शनी ठिकाणी सूचना फलकावर प्रदर्शित केल्याची खातरजमा करावी. स्वयंघोषणापत्र न दिल्यास कार्यालयप्रमुखांना पालकमंत्री किंवा लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखालील बैठकांमध्ये समज द्यावी, असे मुद्दे परिपत्रकात नमूद करून, संबंधितांना निर्वाणीचा इशारा दिला आहे.

मराठी ही राजभाषा असली तरी, महाराष्ट्राची राजधानी मुंबईत मराठी माणूस, मराठी भाषेला अन्य भाषिक महत्त्व देत नव्हते. बँकांपासून केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयात मराठी माणसाला मराठी बोलण्याचे सोडाच, नोकऱ्यांही मिळत नव्हत्या. १९६७-६८ या काळात मराठीची गळचेपीविरोधात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सुरुवातीला आवाज उठवला होता. त्यावेळी मोठ्या पदावर कार्यरत असलेल्या दक्षिण भारतीय लॉबीविरोधात संघर्ष करत शिवसेनेची स्थापना झाली होती. शिवसेनाप्रमुखांनी दिलेला 'हटाव लुंगी बजाव पुंगी'चा नारा आजही नव्या पिढीच्या स्मरणात राहणारा आहे; परंतु पन्नास वर्षांचा काळ लोटला गेल्यानंतरही, मराठी सक्तीसाठी जर महाराष्ट्रात कोणत्याही पक्षाला आंदोलनाचा इशारा द्यावा लागत असेल, तर मराठी भाषेचा प्रश्न आजही रेंगाळलेला दिसतो.

याला महाराष्ट्रातील जनतेची उदासीनता कारणीभूत आहे. प्रवासात असताना आपल्याला भेटलेल्या व्यक्तीशी संवाद साधताना, अनेक जण मराठीऐवजी हिंदीत बोलतात. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रातील शहरात रोजगारासाठी आलेल्या अन्य राज्यातील तरुण हा सर्रास हिंदी भाषेचा वापर करताना दिसतो. कधी तरी मग आपले मराठी प्रेम उफाळून येते. त्यानंतर, मोबाईल गॅलरीत, बँकेत अमराठी व्यक्तीने मराठी बोलण्यास नकार दिला की, वाद झाल्याची अलीकडची मुंबईतील तीन-चार उदाहरणे डोळ्यांसमोर येतात. महाराष्ट्र सरकारने केंद्रीय आस्थापनांमध्ये मराठी सक्तीचे उचललेले पाऊल कौतुकास्पद असले तरी, मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारांमध्ये जास्तीत जास्त मराठीचा वापर करण्याचा संकल्प करायला हवा. केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असल्याने, मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी मराठी जनांवरसुद्धा आहे. रोजगार, व्यापारानिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यांतील लोक महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत येतात. भाषेमुळे त्यांची कामे अडणार आहेत, असे जेव्हा त्यांना वाटेल तेव्हा ती मंडळीही मराठी भाषा आत्मसात करण्याचा नक्कीच प्रयत्न करतील. पण, मातृभाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांवरही तिचा अधिक वापर करायला हवा, हे विसरून चालणार नाही.

# मुंबईची तुंबई थांबणार कधी?



मुंबईला पावसाने २६ मेच्या पहाटेपासून अक्षरशः झोडपून काढले. मुंबई शहर आणि उपनगरात दोनशे मिमीपेक्षा जास्त पाऊस पडला. मुंबईचे जनजीवन ठप्प झाले. मध्य, पश्चिम, हार्बर, ट्रान्स हार्बर आणि मेट्रो रेल्वे सेवाही काही काळ बंद पडली. सर्वात कहर म्हणजे बीकेसी ते वरळी आचार्य अत्रे चौक या मार्गावरील भुयारी मेट्रो ३ चे उद्घाटन पंधरा दिवसांपूर्वीच झाले होते. पावसाचे पाणी घुसले आणि मेट्रो स्टेशनला तलावाचे स्वरूप आले. मान्सूनचा पहिल्या सलामीत धो धो पाऊस, लोकल बंद, बेस्ट विस्कळीत, रस्ते, रेल्वे मार्ग पाण्याखाली, सर्वत्र पाणीच पाणी, चिखलाचे साम्राज्य. अगदी जेजे आणि केईएम इस्पितळातही पाणी घुसले. मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावरच गुडघाभर पाणी. हिंदमातापासून अंधेरी-मिलन सब वे, शीवचे गांधी मार्केट पाण्याखाली. सोमवारी आठवड्याच्या पहिल्या दिवशीच देशाची आर्थिक राजधानी मुंबईची तुंबई झाली. लाखो कर्मचारी, चाकरमानी आपल्या कामावर जाऊ शकले नाहीत. ठिकठिकाणी पाणीच पाणी साचल्याने लाखो मोटारी सोमवारी रस्त्यावर आल्या नाहीत. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईचे जनजीवन ठप्प झाले. एका दिवसात शेकडो कोटींचे नुकसान झाले. मान्सूनच्या पहिल्या सलामीने देशाची आर्थिक राजधानी ठप्प झाली. मुंबईला सेवा-सुविधा देणाऱ्या डझनभर सरकारी, निमसरकारी यंत्रणा अपयशी ठरल्या. यंदाच्या पावसाळ्यात मुंबई तुंबणार नाही, लोकल सेवा बंद पडणार नाही, असे दावे नेहमी केले जातात, पण एका पावसाने ते फोल ठरवले. नालेसफाई शंभर टक्के न झाल्याचे पावसामुळे उघडकीस आले. मान्सूनचा पाऊस सोळा दिवस अगोदर आला किंवा दोनशे मिमीपेक्षा जास्त पाऊस पडला किंवा गेल्या १०७ वर्षांत मे महिन्यात मुंबईत रेकॉर्डब्रेक पाऊस झाला अशी कारणे देऊन मुंबईचे जनजीवन ठप्प करण्याचे खापर पावसावर फोडले जात आहे. मुंबईकर जनतेने ते कितपत मान्य करावे?

धुवांधार पावसाने मुंबईची तुंबई झाली आणि मुंबई ठप्प झाली हे काही पहिल्यांदाच घडलेले नाही. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईचे जनजीवन दोन-तीनदा तरी विस्कळीत होते. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही पावसाळ्यात मुंबईची तुंबई झाली होती. मुंबई ही देशाचे अत्यंत महत्त्वाचे महानगर आहे. मग दरवर्षी मुंबईवर पावसाळ्यात जनजीवन विस्कळीत होण्याची आफत यावी? मुंबई महानगराला मुंबई महापालिका नागरी सेवा-सुविधा पुरवते. पंचवीस वर्षांहून अधिक काळ मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या उबाठा सेनेची (पूर्वीच्या शिवसेनेची) सत्ता होती. पंचवीस वर्षे सलग सत्ता असूनही ठाकरे यांच्या पक्षाला मुंबई जलमयमुक्त किंवा अतिक्रमणमुक्त का करता आली नाही? पंचवीस वर्षांच्या कालावधीत मुंबईवर आदळणारे परप्रांतीयांचे लोंढे ठाकरे यांच्या पक्षाला नियंत्रणात का ठेवता आले नाहीत? पंचवीस वर्षांत महापालिकेचा कारभार भ्रष्टाचारमुक्त का करता आला नाही. पंचवीस वर्षांत किती अमराठी ठेकेदारांना महापालिकेची रस्त्याची, पुलांची, खड्डे बुजवायची, उड्डाणपुलांची, स्वच्छता व मलनिस्सारणाची कामे दिली गेली? ठाकरे यांच्या पक्षाच्या कारभाराचा मुंबईची तुंबई होण्याशी किती संबंध आहे हे सुद्धा लोकांना समजले पाहिजे.

जपानला मागे टाकून भारताने जगातील चौथी अर्थव्यवस्था असा सन्मान प्राप्त केला आहे. त्यात मुंबईचे आर्थिक योगदान सर्वात मोठे आहे. केंद्र सरकारच्या दरमहा जमा होणाऱ्या जीएसटीमध्ये सर्वाधिक वाटा हा मुंबईचा आहे. केंद्र सरकारच्या एकूण महसुलात मुंबईचा वाटा सुद्धा सर्वाधिक आहे. कितीही उद्योग व प्रकल्प दुसऱ्या राज्यात स्थलांतरीत झाले तरी मुंबईचे महत्त्व कमी होणार नाही. पण मुंबई ही केवळ सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे किंवा सरकारी खजिना भरणारे समृद्ध शहर आहे, अशी मानसिकता कोणाचीही असता कामा नये.



## इंडिया कॉलिंग

**डॉ. सुकृत खांडेकर**

देशातील सर्व राज्यातील व केंद्रीय नेत्यांची घरे मुंबईत आहेत. बॉलिवूड ही तर मुंबईची शान आहे. मोठमोठ्या कंपन्या व बडे उद्योग समूह यांची नोंदणीकृत कार्यालये मुंबईतच आहेत. उत्तुंग पदांवर पोहोचलेले राजकीय नेते, मोठे उद्योगपती, अर्थशास्त्रज्ञ, साहित्यिक, कवी, विकासक, वास्तुशास्त्रज्ञ, शिल्पकार, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कलाकार, खेळाडू, संगीतकार, नाटककार, अशी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मांदियाळी हे मुंबईचे वैभव आहे. दिल्लीच्या तोडीस तोड प्रवाशांची वाहतूक करणारा आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईत आहे. देशातील सर्व शहरांना जोडणारी विमान व रेल्वेसेवा आणि बंदर अशा सुविधा मुंबईतच आहेत. मुंबईत बँका, विमा कंपन्या, दूतावास, खासगी कंपन्यांची मुख्यालये व वाणिज्य कार्यालये मुंबईतच आहेत. मुंबईचे ऐतिहासिक, भौगोलिक आणि व्यापारी महत्त्व देशातील अन्य कोणत्याही शहरापेक्षा खूपच मोठे आहे. दीड कोटी लोकसंख्येची मुंबई आणि ठाणे, नवी मुंबईसह दोन कोटी लोकसंख्येची महामुंबई अहोरात्र धावत असते. मुंबईसारखे वर्किंग कल्चर देशात कुठेही नाही. मुंबईत खिशात पन्नास - शंभर रुपयांतही सामान्य माणूस पोटभर जेवण करू शकतो आणि श्रीमंतांसाठी त्रितारांकित व पंचतारांकित उंची सेवा देणारी हॉटेल्सही भरपूर आहेत. मुंबईत जशी मीटरवर धावणारी रिक्षा- टॅक्सी अहोरात्र उपलब्ध आहे, तसेस सामान्यांना आरोग्यसेवा देणारी महापालिकेची व सरकारी इस्पितळे उपलब्ध आहेत. तसेच देशातील सर्वोत्तम खासगी इस्पितळे मुंबईतच आहेत. उत्तम शिक्षणसंस्थाही याच महानगरात आहेत. हिंदी प्रदेशात विकास प्रकल्पांच्या नावाखाली हजारो कोटींची गुंतवणूक केली तरी यूपी, बिहार, हरियाणा, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगालकडून रोजगाराच्या शोधात येणारे सर्वाधिक लोंढे मुंबईकडे येतच असतात. देशाचा आर्थिक आधारस्तंभ असलेली मुंबई एका मुसळधार पावसाने ठप्प होते, हे दुर्दैव आहे. मुंबईची दरवर्षी होणारी तुंबई कधी थांबणार हाच लाखमोलाचा प्रश्न आहे.

मुंबई हे तीन बेटांचे मिळून बनलेले शहर आहे. मुंबईच्या बेटावर किती लोकसंख्या राहू शकते, किती टोलेजंग इमारती उभ्या राहू शकतात, किती लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्याची क्षमता आहे, लोकल किंवा बस वाहतूक किती प्रवाशांना सेवा देऊ शकते, किती झोपडपट्ट्या या शहराने सांभाळायच्या, यावर राज्यकर्त्यांनी व लोकप्रतिनिधींनी मंथन केले आहे का? विधिमंडळात पूर्वी मुंबईच्या प्रश्नांवर सखोल चर्चा व्हायची. मुंबईत एक कोटींपेक्षा जास्त लोक अमराठी आहेत. परप्रांतातून येणाऱ्या अनोळखी लोकांची पार्श्वभूमी काय आहे, याची माहिती तरी पोलिसांकडे आहे का? मुंबई ही सार्वजनिक धर्मशाळा झाली आहे का? मुंबईत कष्ट करून पोट भरणारी जनता लाखोंच्या संख्येने आहे, मुंबईत येऊन अनेक गडगंज झालेत. मुंबईत येऊन आपण मोठे व्हावे असे स्वप्न बाळगून लोक इथे येत असतात. मग मान्सूनच्या पहिल्या पावसाने लक्षावधी मुंबईकरांना घरी बसावे लागले, ही मालिका कधी थांबणार आहे?


मुंबईचा आकार बशीसारखा आहे, जोरदार पाऊस सुरू असताना समुद्राला भरती आली की पाणी वाहून जात नाही व रस्त्यावर पाणी साचते असेही कारण वर्षानुवर्षे सांगितले जाते. मग त्यातून मुंबईची सुटका कधीच होणार नाही का?

मुंबईच्या लोकल्समधून रोज ७५ लाखांहून अधिक प्रवास करतात. मुंबईच्या बेस्टमधून आजही तीस लाख प्रवास करतात. १९९०-९५ पर्यंत अनेक आमदार-नगरसेवक हे लोकलने सीएसटी किंवा चर्चगेटला यायचे, स्टेशनबाहेर बेस्टच्या बस थांब्यावर उभे असलेले दिसायचे. भाजपाचे राम नाईक हे केंद्रात मंत्री झाले, राज्यपालही झाले, पण ते आमदार असताना लोकलने चर्चगेटला यायचे. अशी आणखी काही नावे सांगता येतील. राम नाईक, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, प्रेमकुमार शर्मा, हशू अडवाणी, राम कापसे, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर अनेक लोकप्रतिनिधी मुंबईच्या प्रश्नांवर विधिमंडळात पोटतिडकीने बोलत असत. आता तसे चित्र दिसत नाही. महापालिका, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, मेट्रो रेल्वे, मध्य किंवा पश्चिम रेल्वे, बेस्ट, म्हाडा, सार्वजनिक बांधकाम, एसआरए आदी यंत्रणा मुंबईसाठी राबत आहेत. अतिवृष्टीतही रेल्वे आणि बेस्ट मुंबईकरांना सेवा देते त्याला तोड नाही. लक्षावधी मुंबईकरांचे दैनंदिन जीवन सार्वजनिक सेवेवरच अवंलबून आहे याची जाणीव रेल्वे आणि बेस्टला आहे. लोकांनीही रस्त्यावर कचरा टाकणार नाही, पान, तंबाखू थुंकणार नाही, रुळांवर चूळ थुंकणार नाही, कागदाचे बोळे, प्लास्टिकच्या पिशव्या कुठेही फेकणार नाही असा निर्धार करायला नको का? मुंबई स्वच्छ राहिली तर तुंबई होणार नाही, नालेसफाई चांगली झाली तर रस्त्यावर व रुळावर पाणी साचणार नाही. कचराकुंड्यांची साफसफाई झाली तर गटाराचे पाणी अस्ताव्यस्त पसरणार नाही. भारत देश जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही मुंबईची तुंबई होणे आवडणार नाही...

**sukritforyou@gmail.com**
**sukrit@prahaar.co.in**

# विज्ञानाचा आध्यात्मिक वारकरी

डॉ. जयंत नारळीकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या प्रयोगांची आता चर्चा सुरू झाली आहे आणि नारळीकर यांनी विज्ञानाला काय दिले याचीही चर्चा सुरू आहे. प्रकांड पंडित, विज्ञानाच्या अनेक पदव्या मिळवलेला तपस्वी, वयाच्या २६ व्या वर्षी पद्मभूषण पुरस्कार मिळवलेला ज्ञानी आणि केंब्रिज विद्यापीठासह अनेक विद्यापीठांतून मोठ्या पदव्या मिळवलेला विज्ञानाचे व्रत अंगीकारलेला शिक्षक असे अनेक प्रकारे त्याचे वर्णन केले गेले. पण डॉ. नारळीकर हे आपल्यामध्ये खराखुरा वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे होते. त्यांचे अनेक पैलू समोर आले नाहीत.



वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल त्याना काय वाटायचे याबद्दल त्यांची मुलाखत २०१८ मध्ये घेण्यात आली होती. त्यात नारळीकर यांनी आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल काय वाटते हे स्पष्ट करून सांगितले आहे आणि ते प्रत्येकाने कायमचे मनावर कोरून ठेवले पाहिजे. डॉ. नारळीकर म्हणतात की, महाभारत काळात ब्रम्हास्त्र होते असे आपली पुराणे सांगतात. पण त्या काळात वीज होती का, हे मला कोण सांगेल. आज आपल्याला विजेचे आविष्कार दिसतात आणि ते आपण मुलांना सांगतो. पण जेव्हा वीजही नव्हती तेव्हा ब्रम्हास्त्र किंवा पुष्पक विमान कसे असू शकेल असा प्रश्न कुणाच्याही मनात येत नाही. नारळीकर हे आज गेले आहेत म्हणून त्यांचे कौतुक करणारे आणि त्यांच्या कार्याची प्रशंसा करणारे अनेक लेख दैनिकांत प्रकाशित झाले आहेत. पण ते असतानाही कुणालाही हे सुचले नाही की, वीज नव्हती त्या काळात R ब्रम्हास्त्र किंवा ज्याला छद्मविज्ञानात मान्यता दिली जाते त्या शोधांनी कसे जग काम करत असेल? याचा कुणी विचार करत असेल का?



**उमेश कुलकर्णी**

डॉ. नारळीकर यांनी बिग बँग थिअरीला नवा आयाम दिला आणि ती फ्रेड हॉयल नारळीकर थिअरी म्हणून ओळखली जाते. पण त्यातही वाद करणारे लोक होतेच. आता ती सर्वमान्य झाली आहे. पण खरा वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणारा माणूस दुसरे कोणतेही तत्त्वज्ञान स्वीकारू शकत नाही आणि त्याच्याशी प्रामाणिक राहातो हेच नारळीकर यांच्या जीवनाच सार होते. नारळीकर यांच्याबद्दल बोलताना आपण फारच सिंपलीफिकेशन करतो. नारळीकर यांचा विरोध अध्यात्माला नव्हता. पण त्याचा उपयोग करून भोळ्याभाबड्या लोकांना फसवणाऱ्या आणि त्यांना लुटणाऱ्या साधुमहंतांना होता. डॉ. नारळीकर हे प्रख्यात विज्ञानकथा लेखक होते आणि त्यांच्या कितीतरी विज्ञाम कथा गाजल्या. त्यांच्या या लोकप्रिय साहित्यिक भांडवलावर ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. पण त्यांचा विचार केवळ आपण ते वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे होते याचा न करता ते विज्ञानवादी होते म्हणजे अध्यात्माला न मानणारे होते असा आपण काढतो. महत्त्वाच्या विषयांवर त्यांचे विचार आपण समजून घेत नाहीत. त्यांना केवळ अध्यात्म आणि विज्ञान याच परिघात ठेवतो. पण त्यांनी शाळांमध्ये ग्रंथालये अद्ययावत असावीत आणि मुलांना मराठी म्हणजे त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण दिले जावे, हे त्यांचे विचार विसरून जातो.

डॉ. नारळीकर यांनी विज्ञानाला श्रेष्ठ मानले आहे की नाही, हा गंभीर विषय जाऊ द्या. पण त्यांनी जे मुलांना मराठीतून शिक्षण दिले पाहिजे, म्हणजे तो उत्कृष्ट समजेल हा जो विचार मांडला आहे त्याकडे आपण दुर्लक्ष करतो. डॉ. नारळीकर यांनी आपल्या आत्मचरित्रात उत्तम विचार मांडले आहेत. त्यात त्यांनी मुलांना मातृभाषेतून शिक्षण आणि ग्रंथालये सुसज्ज असावीत अशी गरज मांडली आहे. त्यापैकी किती जण त्यांचे हे विचार आत्मसात करतात आणि आत्मसात करणे तर सोडून द्या, पण त्यांचे हे विचार किती जणांना माहीत तरी आहेत हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अजून आपल्याला माहीत नाही की, विश्वाची उत्पत्ती कशी झाली आणि जीवात्मा कसा आला. डार्विनही हे सांगू शकत नव्हता. तरीही आपण तेच सामान्य विषय काढून वाद घालतो आणि सारे काही आपल्याला ठाऊक असल्यासारखे सांगत बसतो. नारळीकर यांनीही हे आपल्याला सारे काही समजले आहे हे मान्य केले नाही.

पण शाळेत मातृभाषेतून शिक्षण आणि ग्रंथालये सुसज्ज असावीत हे तर साधे विचार आहेत त्यासाठी फार मोठे परिशीलन करायला नको. नारळीकर यांचे म्हणणे होते की, आपण शोधत जायचे आणि आपल्याला काही तरी सापडेल, पण ना अध्यात्माला सर्व काही कळले आहे ना विज्ञानाला. पण आपण जो पक्ष घेतो त्या बाजूने आपल्याला सोयीस्कर युक्तिवाद करतो. त्याने समोरचा नामोहरम होतो. पण शेवटी ते काही अंतिम सत्य नसते. खगोल शास्त्रातील अनेक शोध त्यांनी लावले आणि त्यांना त्यांचा जनक म्हटले जाते. पण आपल्यासारखी बोलघेवडी नव्हे तर खरीखुरी वैज्ञानिक भावना आपल्या तमाम भारतीयांत असावी ही त्यांची भावना होती आणि त्यातूनच त्यांनी विज्ञान प्रसाराचे कार्य केले.

१९७९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या यक्षांची देणगी या त्यांच्या कथासंग्रहाने विज्ञानकथेच्या कक्षा ओलांडल्या आणि त्या बदलल्या. त्यांच्या विज्ञानकथांमुळे मोठा वर्ग विज्ञानाकडे वळला हे सत्य आहे. त्या दृष्टीने त्यांचे कार्य लाखमोलाचे आहे. शास्त्रीय बैठकीसह त्यांनी साहित्य विश्वात विज्ञानाची पणती तेवत ठेवली हे त्यांचे विशेष कार्य आहे. त्यांच्या बिग बँग थिअरीला नवा आयाम देणारे वैज्ञानिक कार्य विज्ञान अभ्यासकाच्या लक्षात येईल, पण त्यांचे इतर जे कार्य आहे ते सामान्य माणसासाठी आहे आणि त्यांचा हेतूच हा होता की विज्ञान साध्या सोप्या भाषेत सर्वांना समजून सांगता यावे आणि लोकांनी त्यावर चर्चा करावी. त्या दृष्टीने त्यांचा हेतू पुष्कळच सफल झाला. नारळीकर हे निःसंशय विज्ञानवादी होतेच. पण ते डोळस विज्ञानवादी होते. त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याने लोकांच्या मनातील संभ्रम वाढला नाही तर तो मिटवण्याचा प्रयत्न केला. त्या दृष्टीने ते अध्यात्माचे विज्ञानवादी वारकरी होते असे म्हणावे लागेल.

## राशिभविष्य

बुधवार, २८ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध द्वितीया शके १९४७, चंद्र नक्षत्र मृग, योग धृती, चंद्र राशी वृषभ. भारतीय सौर ७ ज्येष्ठ शके १९४७ म्हणजेच बुधवार दिनांक २८ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.००, मुंबईचा सूर्यास्त ०७.१०, मुंबईचा चंद्रोदय ०६.४७, मुंबईचा चंद्रास्त ०८.४८, राहू काळ १२.३५ ते ०२.१४, चंद्रदर्शन, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : महत्त्वाची कामे मार्गी लागतील.

**वृषभ** : मालमत्तेच्या कामामध्ये यश मिळेल.

**मिथुन** : व्यवसाय धंद्यात चांगले फायदे होतील.

**कर्क** : जमाखर्चाचा ताळमेळ राहील.

**सिंह** : आर्थिक आवक उत्तम राहील.

**कन्या** : आर्थिक उलाढाली जपून करा.

**तूळ** : कामाचे फळ आपल्याला मिळेल.

**वृश्चिक** : कामाचे स्वरूप बदलू शकते.

**धनू** : पर्यटनाच्या निमित्ताने प्रवास घडेल.

**मकर** : महत्त्वाच्या कामात अडचण.

**कुंभ** : कामाचा ताण जाणवेल.

**मीन** : कौटुंबिक सुख मिळेल.

# 'बहर'

**मेघना कालेकर**

कधी आनंदाचा तर कधी उत्सुकतेचा, काळजीचा विषय 'स्त्री'साठी. एखाद्या महिन्याला चुकला तर आनंद आणि काळजी वाटणारा. दर महिन्याला वाट पाहायला लावणारा, तर कधी संकोच व त्याच मनाला गेलेला विषय...

"मासिक पाळी"

स्त्रीच्या आयुष्यातील 'परीपूर्णता' ठरणारा हा महत्त्वाचा नैसर्गिक घटक. स्त्रीच्या जन्मापासून वाढीच्या प्रत्येक टप्प्यात आणि सरतेशेवटी ही क्रिया बंद होण्याचा काळ या मासिक पाळीवर ठरतो. मुलगी वयामध्ये आली हे मासिक पाळीमुळे जाणवते. हा विषय कधी संकोच तर कधी टाळला जाणारा विषय होता. धार्मिक कार्यामध्ये 'मासिक पाळी' येणे व ती येऊ नये म्हणून विविध शास्त्रीय/अशास्त्रीय औषधोपचार स्त्रियांना सुचविले जातात. अजूनही 'मासिक पाळी'च्या काळामध्ये 'धार्मिक कार्य' करणे टाळले जाते. तर कधी ते 'चार' दिवस महिन्यातून घरात बाजूला बसविले जाते.

विवाहाच्या वयामध्ये 'मासिक पाळी' येणे हे महत्वाचे मानले गेले. कारण त्यावर वंशवृद्ध ठरते. दर महिन्याला पाळीची हजेरी असणे महत्त्वाचे ठरते. कुमारी मुलीला दर महिन्याला मासिक पाळी येणे हे आई-वडील व पालकांच्या काळजीचा विषय तर नव विवाहितेला एखाद्या महिन्याला मासिक पाळी चुकणे, हा आनंदाचा विषय. नव्या वंशवेलीच्या आगमनाची ही सूचकता.

काही भागामध्ये मुलींच्या 'मासिक पाळी' येण्याचा उत्सव साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणाच्या प्रथेप्रमाणे, काही धार्मिक... काही ठिकाणी नवीन वस्त्रे देऊन मुलींचे कौतुक केले जाते. तर आपले आता अल्लड बालपण संपले. अजून जबाबदारीने वागायचे, प्रत्येक गोष्ट करताना समंजसपणे वागावे लागेल, हे समजून जाते. या विषयाबद्दल असणारी, शास्त्रीय माहिती तिची उपयोगिता, आवश्यक असणारी स्वच्छता, समज व गैरसमज या विषयी आता सर्वत्र जागरूकता वाढली आहे. अगदी घरच्या जुन्या कपड्यांपासून वापरली जाणारी साधने ते आता अत्याधुनिक सॅनिटरी नॅपकिन यांचा शोध व वापर, आपले जीवन सुसह्य करतो. देशाच्या काही भागांमध्ये इकोफ्रेंडली सॅनीटरी नॅपकिन तयार केले जातात व वापरले जातात. त्यांची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावण्यासाठी प्रत्येक ठिकाणी नवीन पद्धती अवलंबिली जाते. धार्मिक कार्यामध्ये मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी विविध औषध योजना अथवा संतती नियमनाचेसाठी केले जाते.




योग्य मार्गदर्शन, योग्य तज्ज्ञांचा सल्ला यामुळे जीवघेणे निर्णय घेणे टाळले जाऊ शकते.

"मेनोपॉज" हा मासिक पाळी संपण्याचा काळ आता ग्लोबल वॉर्मिंगमुळे 'मासिक पाळी' येणे अथवा बंद होणे, हे अलीकडील लवकर वयामध्ये होते. तेव्हा या काळामध्ये होणारे विविध शारीरिक व मानसिक त्रास यामुळे आपला बहराचा काळ, तारुण्याचा काळ संपत आल्याने आपली प्रौढताकडे वाटचाल सुरू झाल्याचे जाणवू लागते. तर कधी गर्भपिशवीला विविध कारणाने इजा होते, तर कधी अतिरक्तस्त्राव, तर कधी अनैसर्गिक पेंशीची वाढ, तर कधी याविषयीच्या धोकादायक आजारांची भीती यामुळे शस्त्रक्रिया करून गर्भपिशवी काढावी लागते. यासाठी योग्य निदान विविध अत्याधुनिक तपासण्या, संतुलित मन शरीर यांची सोबत आवश्यक ठरते.


कधी वेळेस सर्व काही अनुकूल असून सुद्धा अपत्यहीन असणारी जोडपी पाहण्यात येतात. काही दांपत्य एकमेकांना उत्तम सोबत चांगले सहजीवन जगतात. तर काही वेळेस अनेक वर्षे लग्नाला होऊन सुद्धा मुलबाळ होत नसल्याने स्त्रियांचा छळ केला जातो आणि लागोपाठ अनेक मुली जन्माला आल्या म्हणून स्त्रीचा छळ केला जातो. खरे तर अपत्य होणे अथवा न होणे आणि फक्त मुलीच जन्माला येणे याच्या शास्त्रीय कारणांची माहिती अजून समाजात मिळालेली नाही. या विषयांची योग्य जागरूकता शास्त्रीय ज्ञान सर्वांना योग्य वेळेमध्ये मिळाले तर स्त्रियांचे हाल थांबतील असे वाटते.

स्त्रीच्या आणि तिच्या कुटुंबाच्या आयुष्यात मासिक पाळी नियमित येणे, विवाह व गर्भावस्था या दरम्यान झालेले डोहाळे जेवण, बाळाचे नामकरण पुढे कुटुंब नियोजन आणि मासिक पाळी संपल्याची चाहूल लागणे हे अनेक महत्त्वाचे टप्पे आहेत, तर कधी हिंसाचारामधून कुमारिका अल्पवयीन मुलींना याचा सामना करावा लागतो. हे सुद्धा दुर्दैवीच आहे. यांच्या परिवारासाठी घालमेल, चिंता व काळजीचा विषय. विविध प्रसार माध्यमांवर असणाऱ्या जाहिराती, संतती नियमनाच्या उपाययोजना यांची सहज उपलब्ध असणारी साधने, यांचा कधी कधी दुरुपयोग केला जाऊ शकतो.

म्हणून 'मासिक पाळी' हा टाळण्याचा संकोच विषय नाही. विविध तज्ज्ञांचे योग्य मार्गदर्शन, नाटिका, दृश्य चित्र फिती यांचा वापर करता येईल. या 'बहराचे' आपल्याला महत्त्व या माध्यमातून जपता येईल. एक 'बहर' संपेल परत नवीन बहर येणारच निसर्गचक्र अव्याहत चालू राहील.

# असामान्य गर्भाशय रक्तस्राव व त्याचे व्यवस्थापन : (AUB)

असामान्य गर्भाशय रक्तस्राव (Abnormal Uterine Bleeding - AUB) हा स्त्रियांमध्ये आढळणारा एक सामान्य पण चिंताजनक त्रास आहे. मासिक पाळीच्या नियमिततेत, कालावधीत किंवा प्रमाणात येणाऱ्या कोणत्याही बदलाला AUB म्हणतात. स्त्रीरोग तज्ज्ञासाठी हा एक मोठा आव्हानात्मक विषय आहे, कारण या मागची कारणे विविध असू शकतात आणि प्रत्येक रुग्णाची परिस्थिती वेगळी असते.




**असामान्य गर्भाशय रक्तस्रावाची व्याख्या :**

सामान्य मासिक पाळी साधारणतः २५ ते ३५ दिवसांच्या अंतराने येते आणि ३-७ दिवस चालते. रक्तस्रावाचे प्रमाण साधारणतः ५-८० मि.ली. इतके असते. यापेक्षा जास्त किंवा कमी रक्तस्राव, अनियमित चक्र किंवा पाळीशिवाय रक्तस्राव आढळल्यास त्याला असामान्य गर्भाशय रक्तस्राव म्हणतात.

**कारणे :**

FIGO (International Federation of Gynecology and Obstetrics) ने AUB ची कारणे दोन गटांमध्ये विभागली आहेतः

१. PALM (स्ट्रक्चरल कारणे):

P – Polyp:; गर्भाशयाच्या आतील आवरणात तयार झालेले सौम्य गाठी

A – Adenomyosis: गर्भाशयाच्या स्नायूमध्ये अंतर्गत आवरणाचे प्रवेश

L – Leiomyoma (Fibroids): गर्भाशयात तयार होणाऱ्या गाठी

M – Malignancy and Hyperplasia: गर्भाशयाचा कर्करोग किंवा अविकसित पेशीवाढ

२. COEIN (नॉन-स्ट्रक्चरल कारणे):

C – Coagulopathy: रक्ताची गुठळी न बनणे

O – Ovulatory dysfunction: अंडोत्सर्जनात अडथळा

E – Endometrial causes: अंतःस्तराची दोषपूर्ण क्रिया

I – Iatrogenic: औषधोपचारामुळे होणारे बदल

N – Not yet classified: अजूनही ओळख न पटलेली कारणे

**लक्षणे :**

मासिक पाळीमध्ये अत्यधिक रक्तस्राव
पाळीच्या दरम्यान किंवा नंतरही रक्तस्राव
अत्यंत वेदनादायक मासिक पाळी
लोहाची कमतरता (ॲनिमिया)
वंध्यत्वाची तक्रार

**तपासणी व निदान :** स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून AUB चे निदान करताना संपूर्ण इतिहास (पाळीचा नमुना, औषधे, वैवाहिक जीवन, गर्भधारणा) विचारात घेतला जातो. यानंतर पुढील तपासण्या केल्या जातात :

शारीरिक व अंतर्गत तपासणी
CBC, TSH, Prolactin, Coagulation Profile
गर्भाशयाचे अल्ट्रासाऊंड
सोनोहिस्टेरोग्राफी
एंडोमेट्रियल बायोप्सी
हिस्टेरोस्कोपी (आवश्यक असल्यास)

उपचार: AUB च्या उपचाराची निवड रुग्णाच्या वय, रक्तस्रावाचे प्रमाण, कारण, प्रजनन इच्छाशक्ती आणि सहविकारांवर अवलंबून असते.

औषधोपचार:

NSAIDs: वेदना कमी करतात आणि रक्तस्राव थोडा कमी होतो

Hormonal Therapy: प्रोजेस्टेरॉन, कॉम्बाइंड पिल्स किंवा IUD (LNG-IUD)

Tranexamic acid: रक्तस्त्राव कमी करणारे औषध

GnRH agonists: फायब्रॉईड्ससाठी उपयुक्त

Iron supplements: ॲनिमिया दूर करण्यासाठी

शस्त्रक्रियात्मक उपचार:

Dilation and Curettage (D&C): निदानासाठी आणि तात्पुरत्या उपचारासाठी

Hysteroscopic Polypectomy/ Myomectomy: पॉलिप किंवा फायब्रॉइड्स काढण्यासाठी

Endometrial ablation: गर्भाशयाचे अंतःस्तर नष्ट करणे (संतती इच्छाशक्ती नसलेल्या रुग्णांसाठी)



स्त्री आरोग्य
डॉ. स्नेहल पाटील

Hysterectomy: अंतिम उपाय – गर्भाशय काढून टाकणे

**स्त्रीरोग तज्ज्ञाची भूमिका :** स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून AUB चे व्यवस्थापन करताना रुग्णाच्या लक्षणांची सखोल तपासणी करून योग्य निदान करणे, उपचाराचे वैयक्तिक नियोजन करणे व वेळोवेळी फॉलो-अप घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. मानसिक आधार देणे, योग्य माहिती देणे आणि रुग्णाच्या शंका समजून घेऊन समर्पक सल्ला देणे हे तितकेच गरजेचे आहे.

**निष्कर्ष :** असामान्य गर्भाशय रक्तस्राव हा एक गंभीर पण उपचारयोग्य त्रास आहे. वेळेवर निदान व योग्य उपचार यामुळे रुग्णाचे जीवनमान सुधारू शकते. स्त्रीरोग तज्ज्ञाची जबाबदारी केवळ वैद्यकीय मर्यादेत न राहता, समजून घेणारी आणि रुग्णाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारी असावी, हे या व्यवस्थापनाचे खरे यश आहे.

**drsnehalspatil@gmail.com**

# पावस… कूल अ…

पावसाळ्यात तुम्ही अशा कपड्यांची निवड करायला हवी की, ज्या कपड्यांवर तुम्ही भिजलात तरी ते सहज कोरडे होतील. खरं तर पावसात फॅशन करणे थोडे कठीणच असते. कारण कामानिमित्त जेव्हा बाहेर पडावे लागते, तेव्हा अचानक पाऊस आला आणि तुमच्याकडे छत्री नसेल तर कपडे भिजतात,



डॅशिंग केलेली फॅशन पूर्ण बिघडते. काही महिलांना फिकट रंगाचे कपडे परिधान करायला खूप आवडतात. मात्र अशा फिकट रंगांच्या कपड्यांचा वापर पावसाळ्यात कमीच करायला हवा. मग पावसाळ्यात असे कोणते कपडे घालावे? एकदम भारी आऊटफिट परिधान करायचा आहे मग तो कसा करायचा? असे अनेक प्रश्न मुलींना किंवा महिलांना पडतात. पण चिंता करू नका, आज आम्ही तुम्हाला या लेखातून मान्सून फॅशन आऊटफिट्सचे असे काही पर्याय सांगणार आहोत, ज्यामध्ये तुम्ही कम्फर्टेबल राहाल, आणि एकदम स्टायलिशही दिसाल...



सौंदर्य तुझं
प्राची शिरकर

## क्रॉप टॉप विथ हाय वेस्ट जीन्स



अगदी सुटसुटीत आणि आरामदायी असा क्रॉप टॉप आणि यावर हाय वेस्टची जीन्स एकदम कमाल वाटते. पावसाळ्यात तुम्ही ट्रिपला जात असाल तर हा आऊटफिट तुमच्यासाठी एकदम भारी आहे. चमकदार रंगाचे आणि फ्लोरल प्रिंट किंवा एम्ब्रॉयडरी असलेले क्रॉप टॉप तुम्ही हाय वेस्टेड स्कर्ट किंवा जीन्सवर स्टाईल करू शकता.

## जंपसूट

बऱ्याच प्रसंगी घालण्यासाठी जंपसूट हा उत्तम पर्याय आहे. या प्रकारच्या आऊटफिटमध्ये तुम्ही कम्फर्टेबल राहता, त्यामध्ये तुम्ही एकदम स्टायलिशही दिसता. तुमच्या जंपसूटला मॅच होईल अशी ॲक्सेसरीज घातली, तर तुमचा लूक मस्त दिसेल. जंपसूटमध्ये वेगवेगळे पॅटर्न आणि डिझाइन्स तुम्हाला बाजारामध्ये पाहायला मिळतील.



## हाय वेस्टेड प्लाझो विथ शर्ट



तुमच्या वॉर्डरोबमध्ये हाय वेस्टेड प्लाझो पँट्स असायलाचं हवी कारण ही प्लाझो अतिशय सुटसुटीत आणि आरामदायी असते. पावसाळ्यात तुमचा प्रवास वैतागवाणा असेल तर ही प्लाझो आणि तुम्ही व्हाईट शर्ट किंवा ब्लॅक शर्ट नक्की परिधान करू शकता. पावसाळ्यात तुमचा प्रवास आरामदायी होईल.

## जंपसूट विथ जॅकेट

हा जंपसूट परिधान केला तर अट्रॅक्टिव्ह दिसतो. या जंपसूटला जॅकेटची डिझाईन त्याला जोडूनच दिलेली असते त्याने तुमचा लूक अजून आकर्षक दिसतो. पावसाळ्यात परिधान करण्यासाठी एकदम परफेक्ट आऊटफिट आहे.



## लेअरिंग श्रग

लेअरिंग श्रग हा एक नवीन फॅशन ट्रेंड आहे. जीन्सवर स्लिव्हलेस टी-शर्ट आणि ही श्रग तुम्ही परिधान केलं तर तुमचा लूक स्टायलिश दिसेल. या श्रगवर तुमचे फोटोसुद्धा उत्तम येतील. सध्या मार्केटमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे श्रग पाहायला मिळतात. पावसाळ्यात तुमच्यासाठी हा श्रग लूक एकदम भारी दिसेल.



## शॉर्ट फ्लोरल ड्रेस



तुम्ही जर पावसात बाहेर फिरण्यासाठी कारने जाणार असाल, तर हा आऊटफिट तुमच्यासाठी उत्तम आहे. मुलींना किंवा महिलांना वनपीस परिधान करायला आवडत असेल किंवा शॉर्ट आऊटफिट कॅरी करायला जमत असेल, तर त्यांनी हा आऊटफिट निवडायला हवा.

## मॅक्सि ड्रेस



हा ड्रेस अतिशय आरामदायी असणारा आहे. तुम्ही कसाही कॅरी करू शकता. पावसाळ्यात तुमचा हा जॉर्जेटचा ड्रेस भिजला तरी तो लगेच कोरडा होऊ शकतो. या ड्रेसवर फोटोसुद्धा छान येतात. लॉन्ग ड्राइव्हसाठी परफेक्ट आऊटफिट आहे.

## क्रॉप टॉप विथ फ्लेर्ड बॉटम्स



फ्लेर्ड जीन्सचा मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणात ट्रेंड सुरू आहे. फ्लेर्ड जीन्सवर क्रॉप टॉप किंवा स्लिव्हलेस टॉप तुम्ही कशाही पद्धतीने वेअर करू शकता. जर तुम्ही राईडसाठी जाणार असाल तर तुमच्यासाठी एकदम परफेक्ट आऊटफिट आहे.

# कलेतून आयुष्य खुलवणारी

**वह पथ क्या, पथिक कुशलता क्या,**
**जिस पथ पर बिखरे शूल नही,**
**नाविक की धैर्य परीक्षा क्या,**
**जब धारा ही प्रतिकूल नही**

सुरुवातीच्या या ओळींमधूनच प्रत्येकाच्या आयुष्यात येणाऱ्या वळणावळणांच्या रस्त्यांवरूनच आपण योग्य मार्गाकडे वाटचाल करत राहतो, अशा विचारसरणीतूनच कलेतून स्वतःबरोबर इतरांचं आयुष्य खुलवणाऱ्या, बाल ते अबाल वृद्धांपर्यंत सगळ्यांच्याच कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणाऱ्या, वंचित भागातील महिलांच्या आरोग्यासाठी आरोग्य सखी यासारखे उपक्रम राबविणाऱ्या "डॉक्टर अरुंधती भालेराव" यांच्या चैतन्यमयी जीवन प्रवासाबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.

कलासक्त आणि रंगकर्मी असणाऱ्या आई-वडिलांकडून कलागुणांचा वारसा लाभलेल्या अरुंधती ताईंचा जन्म आचार्य विनोबा भावे आणि सेवाग्राम गांधीजींची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या वर्धा येथे झाला. वडिलांनी सुरू केलेल्या "कला सौरभ''नावाच्या संस्थेमुळे त्यांचे बालपण स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, अभिनय, संवाद कौशल्य नेतृत्व गुण अशा व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडणाऱ्या गोष्टींसाठी आग्रही आणि प्रोत्साहन देणाऱ्या रमणीय वातावरणात गेले. शाळेत असतानाच त्यांनी कथाकथन, वक्तृत्व यामध्ये स्वतःची चुणूक दाखवली.



वैशाली गायकवाड

बी. ए. मराठी लिटरेचर ही पदवी संपादन करत असतानाच युवक बिरादरी या संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या कार्यशाळेमुळे वेगवेगळ्या कला प्रकारांशी त्यांचा संबंध आला. त्यामुळेच याच क्षेत्रात पुढील शिक्षण घेऊन त्यांनी करिअर करण्याचा निर्णय घेतला. औरंगाबाद येथून नाट्यशास्त्रात ड्रॅमॅस्टिकमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेताना सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे हे त्यांचे सहकारी होते व स्वर्गीय लक्ष्मण देशपांडे यांच्यासारखे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ रंगकर्मींचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

लग्नानंतर त्या ठाण्यात स्थायीक झाल्या. वऱ्हाड निघाले लंडनला या नाटकामुळे त्यांच्या मनातलं नाट्यप्रेम अधिक रुजलं, फुललं. आव्हान या एकपात्री नाटकाने त्यांच्या अभिनय प्रवासाला सुरुवात झाली. लग्नानंतर त्यांनी बीएड, मानसशास्त्र या विषयात एम ए, पत्रकारिता अशा विविधांगी अभ्यासानंतर चिल्ड्रन्स थिएटर या विषयात पीएच. डी. केली. घर, संसार सांभाळत स्वतःच्या मुलीला देखील वेळ देता यावा यासाठी त्यांनी सुरुवातीला शाळेत समन्वयिका म्हणून नोकरी स्वीकारली. स्थानिक चॅनेलवर वृत्तनिवेदिका, इन मुंबई चॅनलसाठी मुलाखतकार, निवेदन, सूत्रसंचालन अशा विविध क्षेत्रांत प्रभावीपणे स्वतःची छाप उमटवत दूरदर्शनवरील सह्याद्री वाहिनीवर "तीच आकाश पेलताना" या कार्यक्रमात उद्योजिकांना बोलते केले आहे, सध्या "उद्योजकांची बाराखडी" या दूरदर्शनवरील मालिकेत देखील उद्योजकांच्या मुलाखती घेत आहेत.

कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबतच अभिनयाची, नाटकाची, कलेची आवड जपत सुरुवातीला स्वतःच्या घरातून अभिनयाचे धडे गिरवत नाट्य वर्ग सुरू केले. त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीतूनच प्रारंभ कला ॲकॅडमीची सुरुवात झाली. बालनाट्य कार्यशाळा घेताना मुलांसोबत त्यांच्या पालकांनी देखील नाट्यवर्गासाठी मागणी केल्याने त्याच्यातूनच महिलांचे नाट्यवर्ग सुरू केले. २००९ साली "बायकांची स्वारी राजाच्या द्वारी" हे महिलांचे नाटक प्रचंड गाजले, त्यांनी आजपर्यंत १०,००० अधिक विद्यार्थ्यांना नाट्य शिक्षण दिले आहे.



अरुंधती भालेराव

## कर्तृत्ववान ती राज्ञी

संस्थेमार्फत बालनाट्यांसाठी वेगवेगळ्या विषयांवर संशोधन करून त्यांची आखणी करणे. गुजराती, बंगाली आणि कन्नड भाषांचा मराठी अनुवाद असलेल्या कथा निवडून त्यांचं दिग्दर्शन करणे, विविध स्पर्धा आणि उपक्रमांतर्गत मुलांच्या कलागुणांना वाव देत त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणला जातो.

संस्थेची जडणघडण करत असतानाच आलेल्या अनुभवांमधून वास्तविकता दर्शवणारी त्यांची विशिष्ट अशी लेखन शैली मनाला आपसूकच भावते. महाराष्ट्र टाइम्समधील नाट्यकर्मींसाठी पडद्यापलीकडचं अंतरंग, पुण्यनगरीमधील आनंददायी आनंदघन, सगळ्यांनाच स्वतःचा आनंद शोधायला लावणार व्यास क्रिएशन्स प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेले त्यांचं आनंदकुळ पुस्तक. त्यासोबतच अनेक वृत्तपत्र आणि दिवाळी अंकातून त्यांच्या लेखमाला प्रसिद्ध झाल्या आहेत. प्रसिद्ध उद्योजक नानजीभाई पटेल यांचे जीवन चरित्र "शून्य से शिखर तक" या पुस्तकातून त्यांनी सगळ्यांसमोर आणले आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्यांनी लिहिलेले "अभिनय संस्कार" हे पुस्तक पालक आणि मुलांनी आवर्जून वाचण्यासारखे आहे. "झुंज माझी कॅन्सरशी" हे त्यांच्या आईने लिहिलेल्या पुस्तकातील शेवटच्या टप्प्यातील काही भाग स्वतः लिहून कॅन्सर पेशंटसाठी मार्गदर्शक असणारे या पुस्तक विक्रीच्या पैशांमधून विविध सामाजिक संस्थांना मदत केली जाते.

सामाजिक कार्यातही तितक्याच सक्रियतेने सहभाग दर्शवत गरीब महिला मजुरांसाठी कॅन्सर जनजागृती मोहीम, वृद्धाश्रमात वृद्धांच्या आयुष्याची संध्याकाळ आनंदी करण्यासाठीचे विविधांगी उपक्रम, अनाथालयात कला कार्यशाळा, आदिवासी महिलांसाठी कौशल्य विकास कार्यशाळेतून आर्थिक संपन्नता अशा त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना ठाणे नवदुर्गा, ठाणे नगररत्न, मल्टीटॅलेंटेड फेस ऑफ द इयर, इंटरनॅशनल ब्रिलियन्स ॲवॉर्ड, जनकवी पी सावळाराम हा शिक्षण क्षेत्रातला सन्मानित करणारा पुरस्कार, अशा अनेक नामांकित पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे.

समाजभान जपत सातत्याने कलेची सेवा करणाऱ्या अरुंधती ताई फिल्म सेन्सर बोर्डवर ज्युरी म्हणून, केंद्र सरकारकडून मानव अधिकार आयोगाच्या वृद्धाश्रम कोअर कमिटीत, न्यू एज्युकेशन पॉलिसी समिती यांसारख्या विविध संस्थांच्या कमिटीवर त्या सक्रियरीत्या कार्यरत आहेत. अरुंधती ताईंच्या मते "कला" ही केवळ करमणूक नसून मानसिक आरोग्यासाठीचे ते उत्तम औषध आहे त्यामुळे प्रत्येकाने आपल्या अंगी काही ना काही कला ही जोपासलीच पाहिजे व ती दिवसेंदिवस स्वतःबरोबर इतरांना आनंदी करत राहिली पाहिजे, असा मोलाचा सल्ला त्या सगळ्यांना देतात. संस्था, उपक्रम, स्पर्धा या सगळ्यांचे नियोजन करताना त्यांची सडेतोड भूमिका, स्पष्टवक्तेपणा या पलीकडे एक संवेदनशील मनाच्या अरुंधती ताई यांना नकला करायला खूप आवडतं, कोणत्याही नात्यांमध्ये स्वतःचं मत मांडत संवाद साधत, आपल्या माणसांशी प्रसंगी प्रेमाने भांडत नातं जिवंत ठेवणं त्या अधिक पसंत करतात. क्षणभंगुर असणाऱ्या या जीवनात कोणतीही योजना करताना खूप पुढचा विचार न करता आज आता या क्षणात आपल्याला उत्तम काय देता येईल याचा विचार करत त्या कायम उत्कृष्ट काम करण्याला प्राधान्य देतात. आधुनिकतेच्या या युगामध्ये स्त्रियांनी स्वतः स्वावलंबी होऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम असलं पाहिजे. परहित जपताना स्वहित जाणून स्वतःचा शोध घेत मार्गक्रमण करत राहण्याचा मार्गदर्शक संदेश त्या समस्त महिलांना देतात.

अशा शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात अविरत कार्य करणाऱ्या मार्गदर्शक संस्थेचा भविष्यातही कलेचा हा बहर असाच फुलत राहून त्याचे रूपांतर वटवृक्षात व्हावे या सदिच्छेसह आनंदाचा आणि ऊर्जेचा स्त्रोत असणाऱ्या अरुंधती ताईंना पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा!

**Vaishu.gaikwad78@gmail.com**

# उपवासाचे कढी गोळे

उपवासाच्या दिवशी आहार हलका, पचायला सोपा आणि सात्त्विक असावा असा सर्वांचा प्रयत्न असतो. अशा वेळी पारंपरिक चव टिकवून ठेवणाऱ्या आणि आरोग्यदायी घटकांनी भरलेल्या पाककृती अधिक महत्त्वाच्या ठरतात. कढी गोळे ही अशीच एक खास महाराष्ट्रीय रेसिपी— जेव्हा ती उपवासासाठी साजेशी करून केली जाते, तेव्हा तिचं रूप आणखीनच लोभसवाणं होतं. ताकाची आंबटसर चव, राजगिऱ्याच्या पिठाचा सौम्य गोडसरपणा आणि साबुदाणा-शेंगदाण्याच्या गोळ्यांची सुसंगत चव यामुळे ही डिश चवीलाही लाजवाब लागते आणि शरीरालाही ऊर्जा प्रदान करते.

**साहित्य**

**गोळ्यांसाठी**

**साबुदाणा** : १/२ कप (४-५ तास भिजवलेला)
**शेंगदाण्याचं कूट** : १/२ कप
**उकडलेले बटाटे** : १ मध्यम
**हिरव्या मिरच्या** : १-२ (बारीक चिरून)
**जिरे** : १/२ टीस्पून
**मीठ** : सैंधव
**कोथिंबीर** : थोडी (ऐच्छिक)
**तूप / तेल** : वाफवण्यासाठी किंवा तळण्यासाठी

**कढीसाठी :**

**ताक** : २ कप (आंबट चव असलेलं)
**राजगिऱ्याचं पीठ** : २ टेबलस्पून
**सैंधव मीठ** : चवीनुसार
**साखर/गूळ** : १/२ टीस्पून (ऐच्छिक)

**फोडणीसाठी :**

**तूप** : १ टेबलस्पून
**जिरे** : १ टीस्पून
**हिरव्या मिरच्या** : १-२ चिरून
**कढीपत्ता** : ५-६ पाने (जर उपवासात चालत असेल)



**कृती :**

- साबुदाणा चांगला मोकळा करून त्यात बटाटा, शेंगदाणे कूट, मिरची, जिरे, मीठ, आणि कोथिंबीर घालून मळा. छोटे गोळे बनवा.
- हे गोळे वाफवून घ्या (इडली पात्रात १० मिनिटं वाफवा) किंवा तेलात हलके तळा.
- कढी तयार करण्यासाठी ताकात राजगिऱ्याचं पीठ, मीठ, आणि गूळ/साखर घालून गाठी विरघळेपर्यंत फेटा.
- फोडणीसाठी तुपात जिरे, मिरच्या, (कढीपत्ता असल्यास) घालून परता.

त्यात ताकाचं मिश्रण घालून मध्यम आचेवर उकळी येईपर्यंत शिजवा.

- उकळी आल्यावर त्यात गोळे घाला आणि ५ मिनिटं मध्यम आचेवर शिजवा.



सुग्रास सुगरण
गायत्री डोंगरे

**सर्व्हिंग टिप्स :**

- ही उपवासाची कढी गोळे भगर, राजगिऱ्याची पुरी किंवा आलू उपम्यासोबत छान लागते. वरून थोडं तूप आणि कोथिंबीर घालून सजवा.
- उपवासात नित्य नवलाई हवी असेल, तर ही उपवासाची कढी गोळे नक्की करून पाहा. पारंपरिकतेला आधुनिक आरोग्यदृष्टीचा साज चढवणारी एक रुचकर कल्पना!

# मुद्रा भाग ३

मागील लेखात म्हटल्याप्रमाणे प्रस्तुत लेखात आपण शारीर-मुद्रांचा विचार करू या.

**१. योगमुद्रा -**

ओटीपोटावर दाब निर्माण करून रक्ताभिसरणाला गती देणारी तसेच ॲड्रिनील या अंतःस्रावी ग्रंथीचं कार्य सुधारणारी ही महत्त्वाची मुद्रा आहे.

**कृती -**

१. पद्मासन किंवा अर्धपद्मसनात बसावं.
२. हात गुडघ्यावर ठेवावेत.
३. गुडघ्यावरील हात कमरेच्या बाजूनं पाठीमागं न्यावेत.
४. डाव्या हातानं उजव्या हाताचं मनगट पकडावं आणि उजव्या हाताच्या बोटांची मूठ वळवावी.
५. हातांची कोपरं आणि खांदे हळूहळू मागे न्यावेत.
६. कमरेपासून डोक्यापर्यंतचं शरीर ताठ ठेऊन कमरेतून झुकायला सुरुवात करावी.
७. प्रथम ओटीपोट खाली न्यावे. त्यानंतर छाती, खांदे खाली आणावेत.
८. नंतर हनुवटी जमिनीला टेकवावी व त्यानंतर कपाळ जमिनीला टेकवावं.
९. या स्थितीत स्थिर झाल्यानंतर सर्व शरीर शिथिल करावं.
१०. खांदे आणि हातांची कोपर खाली येऊ द्यावी. ही अंतिम स्थिती आहे. या स्थितीत पोटावर दाब आल्यामुळे श्वास रोखण्याची स्वाभाविक प्रवृत्ती होते. त्यामुळे या स्थितीत जाणीवपूर्वक श्वासोच्छ्वास चालू ठेवावा.
११. डोळे बंद करून ओटीपोटावर आलेल्या दाबाची जाणीव ठेवावी आणि त्यावर लक्ष केंद्रित करावं.



मी योगिनी
डॉ. वैशाली दाबके

पूर्वस्थितीत येताना -

१. पोटावरील दाब तसाच ठेवून प्रथम कपाळ वर घेऊन पुढे न्यावं.
२. हनुवटी, मस्तक, खांदे, छाती, ओटीपोट या क्रमानं हळूहळू वर यावं आणि ताठ बसावं
३. हातांची पकड सोडून हात गुडघ्यावर ठेवावेत.
४. पद्मासन अथवा अर्धपद्मासन सोडून द्यावं आणि विश्रांती अवस्थेत बसावं.

हीच मुद्रा वज्रासनामध्येही करता येते.

वज्रासनातील योगमुद्रा जाणून घेण्यापूर्वी वज्रासनाची कृती जाणून घेऊ.

**वज्रासन -**

हे ध्यानात्मक आसन आहे. या आसनात बैठक वज्राप्रमाणे पक्की असते म्हणून याला 'वज्रासन' असे म्हणतात.

**कृती**

१. दोन्ही पाय एकमेकांजवळ ठेवून पाय पसरून बसावं. हात मांड्यांच्या बाजूंना असावेत.
२. डाव्या हातावर आणि डाव्या बाजूला शरीराचा भार घेऊन उजव्या हाताच्या मदतीनं उजवा पाय गुडघ्यात दुमडावा.
३. उजव्या पावलांचा तळवा वर घेऊन पाऊल मागे न्यावं आणि पाऊल उजव्या पार्श्वभागाखाली ठेवावं.
४. यानंतर शरीराचा भार उजव्या बाजूला आणावा आणि डाव्या हातानं डावा पाय गुडघ्यात दुमडून पाऊल डाव्या पार्श्वभावाखाली ठेवावं.
५. अशारीतीनं पार्श्वभागाखाली ठेवलेल्या दोन्ही पावलांचे तळवे वरच्या दिशेनं, चवडा मागच्या बाजूला व पायाचे अंगठे एकमेकांना जोडलेले असावेत.



६. पावलांच्या अशा रचनेवर पार्श्वभाग व्यवस्थित पक्का करावा. हाताचे तळवे गुडघ्याजवळ मांडीवर ठेवावेत.

ही वज्रासनाची अंतिम स्थिती आहे.

**वज्रासनाचे लाभ -**

वज्रासनामुळे ओटीपोटाचं आरोग्य सुधारतं. जननेंद्रियाचं कार्य व्यवस्थित चालतं. पाठकणा ताठ ठेवण्याची सवय होते. घोटे आणि गुडघ्यातील रक्तपुरवठा वाढतो आणि स्नायू अधिक कार्यक्षम होतात. पचन सुधारते.

आता वज्रासनातील योगमुद्रेची कृती पाहू.

वज्रासनातील योगमुद्रा

१. वज्रासनात बसावं.
२. उजव्या हाताची मूठ करून ओटीपोटाजवळ पालथी ठेवावी आणि डाव्या हाताची मूठ डाव्या बाजूला याचप्रकारे ठेवावी.
३. ओटीपोट, पोटाचा वरचा भाग, छाती, खांदे, क्रमाक्रमानं जमिनीच्या दिशेनं यावेत.
४. यानंतर हनुवटी, नाक, कपाळ क्रमाक्रमानं जमिनीला टेकवावेत.
५. या स्थितीत शरीर शिथिल करून कोपरं खाली घ्यावीत.
६. मुद्रेच्या या अंतिम स्थितीत श्वासोच्छ्वास चालू ठेवावा.

मुद्रा सोडताना योगमुद्रेप्रमाणेच कपाळ, हनुवटी, मस्तक, खांदे, छाती, पोट हे शरीराचे अवयव क्रमाक्रमानं सावकाश गतीनं वर घ्यावेत.

७. पूर्वस्थितीला यावं आणि वज्रासन सोडावं.

योगामुद्रा करताना आदर्श स्थिती गाठता आली नाही तरी जितके जमेल तितकं पुढे झुकण्याचा प्रयत्न करावा. ओढून ताणून अंतिम स्थिती गाठण्याचा अट्टहास करू नये.

पद्मासनातील योगमुद्रेप्रमाणे दोन्ही हात पाठीमागे ठेऊनही वज्रासनातील मुद्रा करता येते.

**योगमुद्रेचे लाभ -**

१. पोटाचे स्नायू सुदृढ आणि लवचिक होतात.
२. ओटीपोटाच्या भागातील ॲड्रिनील इत्यादी अंतःस्त्रावी ग्रंथी कार्यक्षम होतात.
३. मोठं आतडं अधिक कार्यक्षम होतं त्यामुळे मलावरोधाचा त्रास कमी होतो.
४. कमरेची दुखणी कमी होतात.
५. ओटीपोटावरील मेद कमी होतो आणि ओटीपोटावरील आवरण लवचिक राहातं.
६. स्त्रियांच्या बाबतीत मासिक पाळीच्या वेळेला होणारा अतिरिक्त स्राव या मुद्रेच्या दीर्घ अभ्यासानं कमी होतो.
७. बाळंतपणानंतर येणारी ओटीपोटाची शिथिलता आणि गर्भाशय खाली उतरणं इत्यादी गोष्टी थांबवण्यासाठी या मुद्रेचा नित्य अभ्यास उपयुक्त आहे.
८. पुरुषांच्या प्रोस्टेट ग्रंथींच्या अतिरिक्त वाढीला प्रतिबंध होतो.

**कोणी करू नये -**

गुडघे, घोटे, मान, तीव्र पाठदुखी, पोटदुखी असेल तर, हर्निया, हायड्रोसिल या विकारांमध्ये, पोटाची शस्त्रक्रिया झाली असेल तर तसेच गर्भवती महिलांनी ही मुद्रा करू नये.

# अवकाळीमुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

## अस्मानी | कांद्यासह फळ पिकांची मोठी हानी

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:मागील पंधरा दिवसापासून आष्टी तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठे थैमान घातल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतात झाकून ठेवलेल्या कांद्यावरची वादळाने उडून गेल्याने कांद्याची भिजून अक्षरश: नासडी झाली. त्यामुळे या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे.

आष्टी तालुक्यात मागील पंधरा दिवसापासून सुरू झालेल्या अवकाळी पावसाने कहरच केला असून शेतकऱ्यांची चिंता वाढवली, खरीप हंगामपूर्व शेती मशागतीचे शेतकऱ्यांनी केलेले नियोजन पुरते कोलमडले. उन्हाळी कांदा, बाजरी, भुईमूग इत्यादी पिकांची काढणी बहुतांश झाली. अशातच तालुक्यात सर्वदूर झालेल्या पावसामुळे शेतातपाणी पाणी झाले आहे. काढून ठेवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतात कांद्याला हवे तितके ऊन न मिळाल्याने साठवलेल्या कांद्यावर काजळी, बुरशी यासारख्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर काही ठिकाणी काढलेला कांदा भिजल्याने कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. उन्हाळ्यात शेतीची नांगरणी करून काही दिवस उन्हामध्ये तापण्यासाठी जमिनीला विश्रांती देण्याची पद्धत आहे. मात्र यावर्षी मे महिना सुरू होताच पावसाने तुफान हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना नांगरणी करण्यास पावसाने उसंतच दिली नाही. त्यामुळे शेतीचे सगळे नियोजन कोलमडले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्तांचे पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे



### सर्वाधिक कांद्याला फटका

अवकाळी पावसाने थैमान घातल्याने शेतात साठवलेल्या कांद्याचे नासडी झाली. वादळाने शेतातील कांद्याच्या ढिगार्यावर झाकलेले ताडपत्री, कागद उडून गेले. त्यामुळे कांदा भिजून शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला. तर महिनाभर आधीच पावसाने हजेरी लावल्याने मे महिन्यात तानावर सोडलेल्या मोसंबी, संत्रा, डाळिंब या फळ पिकांसह द्राक्ष बागांचे वादळाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने बळीराजाच्या डोळ्यात पाणी आले आहे.

## जिओ नेटवर्कचे नेटवर्क मिळेना

बोंबला:कडा परिसरात रेंज नसल्याने ग्राहक त्रस्त



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:मागील काही दिवसांपासून जिओ कंपनीची मोबाईल सेवा सतत विस्कळीत होऊ लागल्याने ग्राहकांची गैरसोय नित्याचीच झाली आहे.

आष्टी तालुक्यातील कडा परिसरात मागील काही दिवसांपासून जिओ कंपनीची मोबाईल सेवा कायम विस्कळीत होऊ लागल्याने ग्राहकांची प्रचंड गैरसोय झाली आहे. मोबाईल नेटवर्क स्लो होणे, मोबाईलवर फोन न लागणे, समोरून व्यवस्थित आवाज न येणे यासारख्या समस्यांमुळे ग्राहकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे मोबाईलवरून करता येणारे संपर्क, बँकिंग सेवा, ऑनलाइन महत्त्वाची कामे रखडल्याने जिओ कंपनीच्या ग्राहकांना मन संताप सहन करावा लागत आहे. जिओ मोबाईल कंपनीने सुरुवातीला ग्राहकांना परवडणारे प्लॅनचे लॉलीपॉप दाखवल्यामुळे अनेक ग्राहकांनी जिओची मोबाईल सेवा घेतली. मात्र आता या जिओची मोबाईल सेवा, म्हणजे असून अडचण, नसून खोळंबा झाली आहे. त्यातच या कंपनीने रिचार्ज प्लॅनमध्ये २५% वाढ करून ग्राहकांच्या खिशात हातघालून आर्थिक कंबरडे मोडले आहे. त्यामुळे बहुसंख्य ग्राहक इतर कंपनीकडे आकर्षित होण्याआधी या परिसरातील जिओ कंपनीच्या टॉवरची फ्रिक्वेन्सी वाढवून मोबाईल सेवा सुरळीत करावी. अशी मागणी ग्राहकातून होत आहे.

## विजेचा लपंडाव अन् पिठाच्या गिरणीत रांगा

समस्या:वीज येतात,गृहिणींची दळण दळणासाठी धावपळ

पुण्यभूमी प्रतिनिधी



कडा:सध्या अनियमित अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळाने काही ठिकाणी विजेचे खांब, तारा तुटल्याने विजेचा लपंडाव चालू झाला. त्यामुळे आता रोजच्या भाकरीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे पिठाच्या गिरणीत दळण दळण्यासाठी रांगा लागल्या आहेत.

आष्टी तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाने 'मे' महिन्यातच रात्रंदिवस धुवाधार हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी विजेचे खांब व तारा तुटल्यामुळे विजेचा प्रश्न पोटापाण्यावर येऊन थांबला आहे.

वीज ये-जा करीत असल्याने पिठाच्या गिरण्या कधी बंद, कधी चालू यामुळे रोजच्या भाकरीचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकदा का वीज आली की, पिठाच्या गिरणीत दळण दळण्यासाठी अक्षरश: गृहिणींनीच्या रांगा पाहायला मिळत आहेत. सध्या वादळी पावसामुळे वीज पुरवठा सुरळीत नसल्याने दळण दळण्यासाठी गर्दी होत असल्याचे गिरणी चालक काकासाहेब कर्डिले यांनी सांगितले.

## भास्करराव जोशी यांचे निधन

पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई:येथील दैनिक सामना चे पत्रकार प्रदीप (नाना) जोशी व अरविंद जोशी यांचे वडील सेवानिवृत्त मंडळ अधिकारी भास्करराव जोशी वय वर्ष ८० यांचे बुधवार ता. २८ रोजी सायंकाळी ६ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर गुरूवार दि.२९ मे रोजी सकाळी ८ वाजता चींतेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात त्यांच्या पश्चात मुलगा अरविंद , प्रदीप यांच्यासह तीन भाऊ ,दोन बहिणी, दोन मुली, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी

अभिवादन:पंकजा मुंडेंची कार्यकर्त्यांसह वैद्यनाथ मंदिरात स्वच्छता

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त परळी भाजपच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या जयंती उत्सवात ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होऊन स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. कुशल प्रशासक, कर्तव्यतत्पर आणि न्यायप्रिय राज्यकर्त्या अहिल्यादेवी होळकर यांची तत्व अंगीकरून आम्ही लोकसेवेची कार्य करत आहोत, त्यांची शिकवण सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याची भावना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने परळी भाजपने राज्याच्या पशूसंवर्धन आणि पर्यावरन व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यनाथ मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम आणि महाआरती आयोजित केली होती. ना. पंकजाताई मुंडे यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांसह मंदिर परिसर स्वच्छ केला. तसेच मंदिर परिसरात असलेल्या अहिल्यादेवींच्या पुतळ्यासमोर महाआरती करून त्यांना वंदन केले. यावेळी 'यळकोट यळकोट, जय मल्हार' आणि अहिल्यादेवींच्या नाम घोषाने परिसर दणाणून गेला होता. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते राजेश देशमुख, सतीश मुंडे, मंडल अध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, पवन मुंडे, पान २ वर

## बियाण्यासाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत

सागर पठाडे:प्रशासनाकडून करण्यात आले आवाहन




पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:खरीप हंगाम २०२५ साठी अनुदानित बियाण्यासाठी केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी २९ मे पर्यंत महाडीबीटी शेतकरी योजना या पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन केजचे तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी केले आहे. खरीप हंगाम - २०२५ साठी सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, भात या पिकांचे अनुदानित बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी केज तालुक्यातील शेतकऱ्यांनी २९ मे पर्यंत महाडीबीटी - शेतकरी योजना या पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक असून बियाणे सोडत १ ते ३ जून दरम्यान पान २ वर

## सरपंच ॲड. नारायण शिंदे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख

अभिनंदनिय:मंत्री संजय शिरसाटांच्या हस्ते नियुक्तीपत्र

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:नागझरीचे सरपंच तथा युवा नेते ॲड.नारायण शिंदे यांची शिवसेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड करण्यात आली असून त्यांच्या रूपाने गेवराई तालुक्यातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक युवा कार्यकर्त्यांना शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी न्याय दिल्याचे दिसून येत असून ऍड.नारायण शिंदे यांच्या निवडीने जिल्हाभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

नुकत्याच जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या या निवडी जाहीर झाल्या असून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, संजय मोरे शिवसेना सचिवांनी निवड पत्र जारी केले आसून बीड येथे झालेल्या



बैठकीत मंत्री संजय शिरसाट यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना ही नियुक्ती पत्रे दिली आहेत. यावेळी मराठवाडा संपर्क प्रमुख पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्क प्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हा प्रमुख स्वप्नील गलधर, जिल्हा प्रमुख अनिल जगताप, जिल्हा प्रमुख सचिन मुळक, युवा सेनेचे बाजीराव चव्हाण, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख रविराज बडे, पान २ वर

## रोटरी क्लब ऑफचा पदग्रहण सोहळा

धोरण:उपस्थित राहण्याचे समितीचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:शहरात नव्यानेच स्थापन झालेल्या रोटरी क्लबला चार्टर प्रदान तसेच पदाधिकारी व सदस्यांचा पदग्रहण समारंभ गुरुवार दि . २९ मे २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत गेवराई येथील न्यू निसर्ग हॉटेलच्या निसर्गरम्य वातावरणात सायंकाळी ५.३० वाजता संपन्न होत आहे .

या समारंभास रोटरी क्लब ३१३२ चे डिस्ट्रीक्ट गर्व्हनर डॉ . सुरेश साबू यांच्या हस्ते आणि डिस्ट्रीक्ट गर्व्हनर २०२५ -२६ रो . सुधीर लातुरे ,पीजीडी रो . हरीष मोटवाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत सहाय्यक प्रांतपाल रो . गणेश मुळे , क्लब सल्लागार रो.राहूल कुलकर्णी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होत आहे. गेवराई शहर व तालुक्यात विविध आरोग्य ,कृषि, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा या क्षेत्रात रचनात्मक सकारात्मक समाजसेवा करण्याच्या हेतुने रोटरी क्लबची संकल्पना राबविण्यात येणार आहे . या समारंभात रोटरी क्लब ऑफ गेवराईचे अध्यक्ष रो . प्रा . राजेंद्र बरकसे , सचिव रो . प्रविण जैन, उपाध्यक्ष सुदाम धुपे, सहसचिव डॉ . नागनाथ मोटे, कोषाध्यक्ष सुरेश बरगे ,बोर्ड डायरेक्टर डॉ विजय सिकची, प्रोजेक्ट चेअरमन धर्मराज करपे यांच्यासह संचालक मंडळाचे पदग्रहण होणार आहे . तरी या सोहळ्यास सर्व रोटरीयन बंधूंनी उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे अध्यक्ष रो . इंजि . नितीन गोपन सचिव रो . डॉ . निलेश जगदाळे यांनी केले आहे .

## डॉ.सारिकाताई क्षीरसागर | बीडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

# धार्मिक ऐक्यासाठी उल्लेखनिय कार्य

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:हिंदूंच्या धार्मिक संघटनासाठी सर्वप्रथम समस्त जाती एकत्र यायला हव्यात. सर्वांना समान वागणूक आणि न्याय मिळाला पाहिजे, हा विचार मांडत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विविध कृतिशील उपक्रम राबवत सामाजिक ऐक्य प्रस्थापित केले. त्यांनी स्वधर्माचे जागरण करताना कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त शहरातील जवाहर कॉलनी येथील सावरकर पुतळ्याजवळ वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर बोलत होत्या.

डॉ.क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, सावरकर हे भारताचे महान स्वातंत्र्यसेनानी व देशभक्त होते. त्यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला. काळ्या पाण्यासारख्या कठोर छळास तोंड दिले, पण आपली देशभक्ती आणि सेवा कधीच सोडली नाही. त्यांच्या विचारांना जनमानसात पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील राहणार आहे. सावरकर पुतळा परिसरात सुसज्ज ग्रंथालय आणि भव्य भगवा ध्वज उभारण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी प्रा.चंद्रकांत मुळे, डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सलीम जहाँगीर, भाजपाचे बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, शिवसेनेचे नितीन धांडे, गिरीश देशपांडे, डॉ.पी.के. कुलकर्णी, ड.उद्धव रासकर, पत्रकार प्रमोद कुलकर्णी आदी मान्यवरांनी सावरकरांच्या कार्याचा गौरव करत भाषणे केली. प्रास्ताविक डॉ. अजिंक्य पांडव यांनी केले. आभार महेश वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमात उपस्थितांनी सावरकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ड.मिलिंद वाघिरकर, माजी प्राचार्य विजेंद्र चौधरी, डॉ. गणेश पान २ वर

## कापरेवाडीत शाळेत शिरले पाणी?

मागणी:प्रशासनाने लक्ष द्यावे



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील कापरेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाऊसाचे पानी शिरले त्यामुळे शाळेत तळे साचले आहे तसेच आता यापुढे पाऊस सुरूच राहणार आहे जर असेच शाळेत गावच्या नालीचे पानी शिरले तर विद्यार्थी नक्कीच अजारी पडल्याशिवाय राहणार नाहीत तसेच आता थोड्याच दिवसात शाळा सुरू होत आहेत परंतु शाळेत जर गावच्या नालीचे पानी शिरले तर विद्यार्थ्यांना साथिचे रोग होतील जसे की डेंगु,ताप,सर्दी , खोकला असे आजार विद्यार्थ्यांना उद्भवतील व शाळेतील विद्यार्थी अजारी पडल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे संमंधीत प्रशासनाने तातडीने शाळेत जाणारे पाणी थांबवले पाहिजे व शाळा स्वच्छ व सुंदर कशी राहील याचा विचार केला पाहिजे कारण गावातील शाळेत गावातील पान २ वर